रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २९१
www.ramprahar.com

◆ रविवार, १० मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

शिक्षणाच्या पुन:संधीतून ४५७ अंगणवाडीताईंचे यश/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
यशस्वी जैस्वाल, शफाली वर्माला 'नाडा'ची नोटीस/८

## एन.एस. राजा सुब्रमणी देशाचे नवे संरक्षणप्रमुख



**नवी दिल्ली :** निवृत्त लेफ्टनंट जनरल एन.एस. राजा सुब्रमणी हे देशाचे पुढील संरक्षणप्रमुख (सीडीएस) असतील. केंद्र सरकारने शनिवारी (दि.९) ही घोषणा केली. सुब्रमणी यांच्याकडे संरक्षण व्यवहार विभागाच्या सचिवपदाची जबाबदारीही असेल. याचबरोबर सरकारने व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन यांची पुढील नौदलप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. दोघेही ३१ मे रोजी पदभार स्वीकारतील. सध्याचे संरक्षणप्रमुख अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी संपेल. एन.एस. राजा सुब्रमणी हे देशाचे तिसरे संरक्षणप्रमुख असतील. सुब्रमणी हे डिसेंबर १९८५मध्ये गढवाल रायफल्समधून सैन्यात अधिकारी म्हणून दाखल झाले. त्यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए)मधून लष्करी प्रशिक्षण घेतले. ३५ वर्षांहून अधिक काळाच्या लष्करी कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाची कार्यचालन आणि सामरिक पदे भूषवली आहेत.

# रायगडात वादळी पाऊस

■ वीज कोसळून मुलाचा मृत्यू, मालमत्तेचेही नुकसान

**तळा, पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि.९) अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. वादळी वारा आणि मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी मालमत्तेचे नुकसान झाले आहे. तळा तालुक्यातील फळशेत कर्नाळा येथे १४ वर्षीय मुलाचा अंगावर वीज पडून मृत्यू झाल्याची घटना घडली, तर इतर दोन जण जखमी झाले आहेत.





अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात प्रामुख्याने तळा, सुधागड, महाड, खालापूर, म्हसळा तालुक्यांमध्ये नुकसान झाले आहे. तळा तालुक्यातील फळशेत कर्नाळा येथील वेदांत जनार्दन भोसले याचा वीज पडून मृत्यू झाला. या दुर्घटनेत अन्य दोन जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

तालुक्यात काही गावांमध्ये घरांचे नुकसान झाले. विजांच्या कडकडाटासह पडलेल्या अवकाळी पावसाने नागरिकांची धांदळ उडाली. यावेळी गाराही पडल्या.

सुधागड तालुक्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला. वादळी पावसामुळे भेरव येथे घरांवरचे छप्पर उडून मोठे नुकसान झाले आहे. कवेळे येथे पोल्ट्रीची शेड उडून सुमारे दीड ते दोन हजार कोंबड्या मरण पावल्या आहेत. पालीवाला महाविद्यालयाचेही पत्रे उडाले. त्याचप्रमाणे जागोजागी झाडे कोसळली व विद्युत खांब पडून वीजवाहिन्या तुटल्या.

महाड, खालापूर, म्हसळा तालुक्यांतही घरांचे नुकसान झाले. याशिवाय जिल्ह्याच्या इतर भागांत पावसाने हजेरी लावली. पावसामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले. वाहतुकीला फटका बसला. काही भागांत वीजपुरवठाही खंडित झाल्याची माहिती मिळत आहे.

अनेक ठिकाणी वृक्ष पडले. दुकानांच्या नावांचे बोर्ड, शेडचे पत्रे उडाल्याच्या घटना घडल्या. लग्नसराई असल्याने मंडपांचे बोर्ड, कापड तुटून पडले. या पावसाने आंबा पिकाचे नुकसान झाले असून वीटभट्टीधारकांनाही तडाखा बसला आहे.

## रयत शिक्षण संस्थेला ३.६२ कोटींची देणगी

# लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, परेश ठाकूर यांचा कर्मवीरभूमीत हृद्य गौरव

**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी स्वतःच्या दातृत्वाने शंभर कोटींहून अधिक रुपयांची आर्थिक मदत करणारे संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार, थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचा तसेच ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि.ने यंदाही संस्थेच्या विकासासाठी तीन कोटी ६२ लाख रुपयांची देणगी दिल्याबद्दल नगरसेवक परेश ठाकूर यांचा संस्थेच्या वतीने अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते शनिवारी (दि. ९) सातारा येथे कर्मवीरभूमीत हृद्य सत्कार करण्यात आला.




रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा ६७वा पुण्यतिथी कार्यक्रम सातारा येथे समाधी परिसरात झाला. कर्मवीर अण्णा आणि रयत माऊली यांच्या समाधीला अभिवादन करून हा समारंभ पार पडला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त संस्थेच्या वतीने अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते विशेष सत्कार व अभीष्टचिंतन करण्यात आले. व्यासपीठावरील मान्यवरांनीही लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक डॉ. अनिल पाटील, व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, उपाध्यक्ष महेंद्र लाड, आमदार दिलीप वळसे-पाटील, खासदार सुप्रिया सुळे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार बाळासाहेब पाटील, आमदार आशुतोष काळे, आमदार रोहित पवार, आमदार चेतन तुपे, जे.के. जाधव, सरोज पाटील, मीनाताई जगदाळे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. **(पान २ वर..)**

## निवडक

### पंजाबमध्ये 'आप'च्या मंत्र्याला ईडीकडून अटक

**चंदिगड :** मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील पंजाब सरकारमधील मंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते संजीव अरोडा यांना शनिवारी (दि.९) ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने अटक केली. ईडीने मनी लॉण्डरिंग, फेमा कायद्याचे उल्लंघन, जमिनीशी संबंधित प्रकरणे आणि संशयास्पद आर्थिक देवाणघेवाणीच्या चौकशीसाठी अरोडा यांच्या चंदिगड येथील सरकारी निवासस्थानावर धाड टाकली. अनेक तास चाललेल्या कारवाईनंतर ईडीने त्यांना अटक केली आहे.

### नाशिक कॉर्पोरेट जिहादप्रकरणी मुख्यमंत्र्यांना अहवाल सादर

**मुंबई :** नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीतील कॉर्पोरेट जिहादप्रकरणी सखोल चौकशी करून राष्ट्रीय महिला आयोगाने तयार केलेला ५० पानांहून अधिकचा सविस्तर अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आला आहे. या अहवालात आयोगाने २५हून अधिक शिफारसी केल्या असून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

# इयत्ता अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया; नियमित कॅप फेरी-१चे वेळापत्रक जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी नियमित कॅप फेरी-१चे वेळापत्रक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. ८ मे रोजी इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग-१ आणि भाग-२ भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून ८ मेपर्यंत एकूण सात लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-१ भरून नोंदणी केली आहे.

इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी https://mahafyjcadmissions.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध माहिती व सूचनांनुसार ऑनलाइन अर्ज सादर करावेत.



प्रवेश प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी, मुलींकरिता विशेष पाचवी फेरी घेण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशासाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करण्याचे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे.

शून्य फेरीमध्ये ८ ते २० मे या कालावधीत विद्यार्थ्यांना नोंदणी व अर्जाचा भाग १ ऑनलाइन सादर करणे, तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे, हरकती/दुरूस्ती मागण्या, सर्वसाधारण गुणवत्ता यादी अंतिम करणे, विविध कोट्यासाठी यादी देऊन रिक्त जागा प्रत्यार्पित करणे तसेच पहिल्या फेरीकरिता जागा प्रदर्शित करणे ही प्रक्रिया होईल.

नियमित कॅप फेरी-१ अंतर्गत नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, भाग-१मधील दुरूस्ती तसेच भाग-२ भरण्याची प्रक्रिया २१ व २२ मे रोजी होईल. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांना पसंतीक्रम देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कॅप फेरी-१ची अलॉटमेंट प्रक्रिया २३ ते २६ मेदरम्यान पार पडणार असून २६ मे रोजी प्रवेश वाटप यादी जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिनद्वारे प्रवेशासाठी वाटप झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती उपलब्ध होईल तसेच एसएमएसद्वारेही संदेश पाठविण्यात येणार आहेत. **(पान २ वर..)**

# प. बंगालमध्ये नव्या पर्वाचा आरंभ!


## सुवेंदू अधिकारी यांनी घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात शनिवारी (दि.९) एका नव्या युगाची सुरुवात झाली आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते सुवेंदू अधिकारी यांनी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर झालेल्या एका भव्य सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवि यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशातील दिग्गज नेते उपस्थित होते.

या विधानसभा निवडणुकीत भाजपने २९३पैकी २०७ जागांवर प्रचंड विजय मिळवून पूर्ण बहुमत प्राप्त केले आहे, तर १५ वर्षे सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. स्वतः सुवेंदू अधिकारी यांनी भवानीपूर मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव करत 'जायंट किलर' ठरले होते.

या सोहळ्याला गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक बडे नेते उपस्थित होते. सुमारे २० राज्यांचे मुख्यमंत्री या सोहळ्याचे साक्षीदार बनले.



सुवेंदू अधिकारी हे पश्चिम बंगालचे नववे मुख्यमंत्री बनले आहेत. त्यांच्यासोबत इतर पाच नेत्यांनी शपथ घेतली. यामध्ये दिलीप घोष, अग्निमित्र पॉल, अशोक कीर्तनिया, खुदीराम टुडू आणि निसिथ प्रमाणिक यांचा समावेश आहे. बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

# नेरळ-शिरूर कॉरिडॉर साकारणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील (एक्स्प्रेस वे) वाढता ताण कमी करण्यासह मराठवाडा आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतून मुंबईकडे होणारी अवजड वाहतूक सुलभ करण्यासाठी राज्य सरकारने निर्णायक पाऊल उचलले आहे. रायगड जिल्ह्यातील नेरळ ते पुणे जिल्ह्यातील शिरूर या १३३.७१ किलोमीटर लांबीच्या नवीन चौपदरी महामार्गाच्या बांधकामाला सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्त्वतः मान्यता दिली आहे.



(प्रातिनिधीक छायाचित्र)

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने राज्यातील सर्व प्रमुख कॉरिडॉर या केंद्राशी जलदगतीने जोडणे ही शासनाची प्राथमिकता आहे. सध्या मराठवाडा आणि अहिल्यानगर भागातील वाहतूक प्रामुख्याने पुणे शहरामार्गे मुंबईला जाते, ज्याचा थेट परिणाम पुणे-शिरूर पट्ट्यातील वाहतूक व्यवस्थेवर होऊन मोठी कोंडी निर्माण होते. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून नेरळ-बांद्रे-पाईट-शिरोली-पाबळ-मलठण-शिरूर अशा नवीन मार्गाची आखणी करण्यात आली आहे.

हा मार्ग पूर्णपणे चौपदरी असेल आणि त्यासाठी आवश्यक जमीन संपादनाकरिता सुमारे एक हजार २२० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला असून ही प्रक्रिया तातडीने राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

खासगी भागीदारीतून (पीपीपी) साकारल्या जाणाऱ्या या प्रकल्पामुळे पुणे-शिरूर रस्त्यावरील दीर्घकालीन वाहतूक कोंडी फुटण्यास मदत होणार असून जेएनपीटी बंदर आणि मुंबईशी थेट कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्राच्या पूर्वेकडून सह्याद्री ओलांडून पश्चिमेकडे जाणाऱ्या वाहतुकीला नाशिक आणि पुणे मार्गाव्यतिरिक्त एक सक्षम आणि वेगवान पर्याय उपलब्ध होणार असल्याने राज्याच्या विकासाला नवी गती मिळेल.



# शेतमालात भेसळ करणाऱ्यांवर शासन कठोर कारवाई करणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी दर्जेदार फळे, भाजीपाला तसेच इतर शेतमालाचे उत्पादन करतात, मात्र काही ठिकाणी फळांची गोडी वाढविण्यासाठी, कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी किंवा अधिक आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत. अशा प्रकारे भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

या संदर्भात कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार समित्या तसेच थेट पणन व्यवस्थेद्वारे होणाऱ्या शेतमाल खरेदी-विक्रीमध्ये भेसळ आणि घातक रासायनिक प्रक्रियांना आळा घालण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलली आहेत. त्यानुसार पणन संचालनालयाने राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार समित्या आणि थेट पणन परवाना धारकांना महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे.

दरम्यान, पणन मंत्री जयकुमार



■ पणनमंत्री जयकुमार रावल यांचा इशारा

रावल म्हणाले की, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला दर्जेदार शेतमाल ग्राहकांपर्यंत सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण स्वरूपात पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.

काही ठिकाणी फळे कृत्रिमरित्या पिकविणे, त्यांची गोडी वाढविण्यासाठी रसायनांचा वापर करणे, फळे व भाजीपाल्यांना कृत्रिम रंग देणे तसेच अन्नधान्य अधिक आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर केल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी बाजार समित्यांनी नियमित तपासण्या करून कठोर उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच भाजीपाला, फळे आणि अन्नधान्याच्या साठवणूक व वाहतुकीमध्ये कमी जाडीच्या प्लास्टिक व थर्माकोलच्या वापरास प्रतिबंध करून पर्यावरणपूरक साहित्याच्या वापराला प्रोत्साहन देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

अन्नधान्य, फळे किंवा भाजीपाल्यामध्ये भेसळ अथवा घातक रसायनांचा वापर झाल्याचा संशय आल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाशी समन्वय साधून अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ अंतर्गत संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे.

दरम्यान, आता भेसळ करणाऱ्या परवाना धारकांचे परवाने रद्द करण्याची कार्यवाहीदेखील जलद करण्यात येईल, असे मंत्री जयकुमार रावल यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार समित्या आणि थेट पणन परवानाधारकांनी शासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करून ग्राहकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही पणनमंत्री रावल यांनी केले. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना निश्चितच दिलासा मिळणार आहे.

## पोलादपूर लोहारे येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटरसायकलस्वाराचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी रात्री ८ ते ९ दरम्यान एका अज्ञात वाहनाच्या धडकेने मोटरसायकलस्वार जागीच ठार झाल्याची घटना पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथे घडली. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञात वाहनाचा शोध सुरू आहे.

लोहारे पवारवाडी येथील शेतकरी बाबूराव भोसले मोटारसायकलवरून जाताना



महानगर सीएनजी गॅस पंपानजिक अज्ञात वाहनाची त्यांच्या मोटरसायकलीला धडक बसून ते जागीच गतप्राण झाले. या अपघाताची माहिती प्राप्त होताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी सहकाऱ्यांसोबत घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या शवविच्छेदन गृहामध्ये पाठविण्यात आला.

## कापडे बुद्रुक येथे चायनीज सेंटरच्या चालकासह सहकाऱ्यांना मारहाण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कापडे बुद्रुक येथे एका चायनीज सेंटरवर ग्राहकांना मद्यपानास प्रतिबंध केल्याने चायनीज सेंटरच्या चालकासह त्याच्या सहकाऱ्यांना मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. ही घटना शुक्रवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली.

फिर्यादी साने (५५), नंदा साने, प्रतीक साने, प्रशांत साने व कृष्णा साने (सर्व रा. गोपाळवाडी, पोलादपूर) हे कापडे येथील प्रशांत चायनीज येथे उपस्थित होते. त्यावेळी ग्राहक म्हणून आलेले आरोपी अजय वाघे व अनिल वाघे यांनी राईसची ऑर्डर दिली. त्यांच्या हातात बिअरची बाटली असल्याने प्रशांत साने यांनी दुकानात पिण्यास प्रतिबंध करून ऑर्डरचे खाद्यपदार्थ तयार झाल्यावर घेऊन जाण्यास सांगितले. यामुळे आरोपी अजय वाघे यांनी संतापून प्रशांत साने यांना शिवीगाळ व धक्काबुक्की करत वाद घालण्यास सुरुवात केली. या प्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माणगाव शहर शिवसेनेच्या मध्यवर्ती पक्ष कार्यालयाचे मंत्री भरत गोगावलेंच्या हस्ते उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयातून जनतेची छोटीमोठी कामे झाली पाहिजेत, असे मंत्री भरत गोगावले यांनी सांगत माणगाव नगरपंचायत निवडणुकीत लागेल ते सहकार्य करण्याचे आश्वासित केले. यावेळी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर म्हणाले की, ज्यांना आपण खासदार म्हणून निवडून दिले त्यांना त्याची जाणीव राहिली नसून येणाऱ्या निवडणुकांत श्रीवर्धन मतदारसंघातील तिन्ही नगरपंचायतींवर आपल्याला भगवा फडकवायचा असल्याचे सांगितले. शिवसेना नेते तथा राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती





पक्ष कार्यालयातून जनतेची छोटी-मोठी सर्व कामे झाली पाहिजेत; मंत्री गोगावले यांचे निर्देश

ज्ञानदेव पवार यांनी आता एकच लक्ष माणगाव नगरपंचायत असल्याचे यावेळी बोलताना सांगितले.

माणगाव शहर शिवसेनेचे मध्यवर्ती पक्ष कार्यालय उतेखोलवाडी या ठिकाणी सुरु करण्यात आले असून या पक्ष कार्यालयाचा उद्घाटन समारंभ ८ मे रोजी सायंकाळी ८ वाजता राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर,तालुकाप्रमुख अॅड.महेंद्र माणकर, शिवसेना नेते ज्ञानदेव पवार, जेष्ठ नेते मारुती बोंबले,जिल्हा परिषद सदस्य दिनेश हरवंडकर,अविनाश नलावडे,तालुका युवासेना अधिकारी ज्ञानेश्वर उतेकर,माणगाव शहर शिवसेना संपर्कप्रमुख प्रसाद धारिया,शहरप्रमुख नितीन दसवते,उपशहरप्रमुख फैमिद जामदार,माणगाव शहर शिवसेना सचिव रणधीर काणोजे,युवानेते सौरभ खैरे,माजी नगरसेवक मनोज पवार,डॉ.परेश उभारे,अनिल सोनार,प्रवीण बागवे, महेंद्र दळवी, माजी नगरसेविका अंजली पवार,माजी उपनगराध्यक्षा स्नेहा दसवते,स्मिता बोंबले, गिरीश वडके,इस्माईल करदेकर,विनोद सुतार,चंदुलाल गुप्ता,बाळा मांजरे,सुरेश पवार,गजानन जाधव आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना भरत गोगावले पुढे म्हणाले की, माणगाव शहराच्या विकासासाठी आपण जो निधी मागितलाय तो निधी लवकरच मी देणार आहे. याअगोदरही आपण शहराच्या विकासासाठी भरपूर निधी दिला असून याचा विसर काहींना पडला त्यांना त्याचे प्रायश्चित्त जिल्हापरिषद निवडणुकीत भोगावे लागले. आपला अनिल नलावडे हा एक सर्व सामान्य कुटुंबातील शेतकऱ्याच्या मुलाने त्या जिल्हापरिषद निवडणुकीत विजय मिळविला. गोरेगावमध्ये दिनेश हरवंडकर यांनी विजय मिळविला. आपण काम करतो म्हणून जनता आपल्याला निवडून देत असते असे सांगत त्यांनी पक्ष कार्यालयाचे उदघाटन झाल्याचे जाहीर केले. यावेळी बोलताना शिवसेना नेते ज्ञानदेव पवार म्हणाले की, आम्ही भगव्यासोबत असून माणगाव नगरपंचायत हेच आमचे लक्ष असून यासाठी आम्हाला ताकद द्या. या कार्यक्रमात माणगाव नगरपंचायतीतील १७ वॉर्डांतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येऊन त्यांना गोगावले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

## पाली नगरपंचायत क्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर यशस्वी; लाभार्थ्यांना सेवांचा लाभ

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली नगरपंचायत क्षेत्रातील भक्तनिवास क्रमांक १ येथे आज 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' टप्पा क्रमांक १ अंतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात लाभार्थ्यांना १५ हून अधिक शासकीय सेवांचे लाभ वितरित करण्यात आले. कार्यक्रमास राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, महिला, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१८ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार हे अभियान राज्यभर प्रत्येक



तालुक्यातील मंडळांमध्ये राबविण्यात येत आहे. सुधागड तालुक्यात यापूर्वी चार मंडळांमध्ये हे शिबीर पार पडले असून आजचे हे पाचवे व अंतिम विशेष शिबीर नगरपंचायत क्षेत्रासाठी आयोजित करण्यात आले.

शिबिरात महसूल, कृषी, भूमी अभिलेख, आरोग्य आणि महावितरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांना सेवा पुरविण्यात आली. या शिबिराच्या यशस्वी आयोजनात तहसीलदार उत्तम कुंभार यांचे सूक्ष्म नियोजन आणि समन्वय महत्त्वपूर्ण ठरले. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमास नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, माजी नगराध्यक्ष व नगरसेवक आरिफजी मणियार,निवासी नायब तहसीलदार भारत फुलपगारे, महसुल नायब तहसीलदार ज्ञानेश्वर आडसुळे, साजिद शेख उपअधीक्षक भूमी अभिलेख, नकुल पोळेकर निवडणूक, नायब तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, सुखदेव वाढणकर रूपेश भादिकर जांभुळपाडामंडळ अधिकार, अधिकारी, अंकुश साळवे मंडळ अधिकारी पेडली,गणेश साळुंखे मंडळ अधिकारी नांदगाव यांसह ग्राम महसूल अधिकारी, भूमी अभिलेख कर्मचारी उपस्थित होते.

## सरेभाग येथे अक्कादेवीचा आठवा वर्धापन दिन सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील सरेभाग येथे शनिवार ९ व १० मे रोजी अक्कादेवी मातेचा वर्धापन दिन सोहळा साजरा होत आहे. शनिवार ९ मे रोजी सकाळी ८ वाजता अभिषेक झाले. दुपारी १ वाजता हभप दीपक म्हात्रे यांचा हरिपाठ झाला. संध्याकाळी ४ वाजता हभप कुणाल ठाकूर (दिव) यांचे प्रवचन, सायंकाळी ६ वाजता हभप नरेंद्र म्हात्रे भाल विठ्ठलवाडी व अक्कादेवी हरिपाठ मंडळ सरेभाग यांचा संयुक्त हरिपाठ, रात्री ८ वाजता कुमार म्हात्रे यांच्या हनुमान प्रासादिक संगीत भजन मंडळाचे भजन, ९ वाजता हभप ज्ञानेश्वरी निवृत्ती पाटील यांचे वारकरी कीर्तन, त्यांना पखवाज साथ हभप ज्ञानराज निवृत्ती पाटील बळवली यांची व किरण झेमसे यांची लाभली. गायन साथ निवृत्ती महाराज पाटील व हभप जयेश महाराज ज्ञानेश्वर महाराज यांची मिळाली.

१० मे रोजी हभप महेश साळुंखे महाराज पनवेल यांचे वारकरी कीर्तन, त्यांना पखवाज साथ ओमकार महाराज यांची लाभेल. दुपारी १२ वाजता विठाई भजन मंडळ कळवे यांचे संगीत भजन व त्यांना पखवाज साथ संकेत पाटील यांची असेल.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, परेश ठाकूर यांचा कर्मवीरभूमीत हृद्य गौरव

आपल्याकडील पैशांचा दातृत्वाने सदुपयोग कसा करायचा याचा आदर्श लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ठेवला आहे. रयत शिक्षण संस्थेचे ते माजी विद्यार्थी. 'कमवा आणि शिका' योजनेत त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांनी शिक्षक म्हणूनही संस्थेत सेवा केली. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शहरांसोबतच आदिवासी व ग्रामीण भागातील रयत शिक्षण संस्थेच्या शाखांना वेळोवेळी गरजेनुसार उदार हस्ते मदत केली. संस्थेच्या गरजांवर तातडीने प्रतिसाद देण्याचे त्यांचे कार्य सतत सुरू असते.

कर्मवीर अण्णांनी तळागाळात शिक्षणाची गंगा निर्माण केली. त्यांचे कार्य निरंतर सुरू राहिले पाहिजे यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर अग्रेसर राहिले आणि तो वारसा ते आजही चालवत आहेत. स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था असूनही त्यांनी रयत संस्थेला मातृसंस्था मानून या संस्थेच्या मदतीला स्वतःला झोकून देत 'रयत'ला खंबीर साथ दिली आहे. संस्थेने सांगायचे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ताबडतोब अंमलबजावणी करायची हे समीकरण चालत आले आहे.

"मळलेल्या वाटेने कोणीही जातो, पण न मळलेल्या वाटेने जाणारेच इतिहास घडवतात". या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अत्यंत दुर्गम भागात शिक्षणाची पंढरी उभी करीत या क्षेत्रात उंची निर्माण केली आहे. त्यांच्या दानातून अनेक शाखा उभारल्या गेल्या आणि त्यामुळे हजारोंच्या नाही, तर लाखोंच्या संख्येत विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत आहे. कर्मवीर अण्णांनी बहुजन समाजाचा विचार करीत रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज संस्थेच्या साडेसातशेहून अधिक शाखांमधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या आणि पर्यायाने तळागाळातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कर्मवीर अण्णांचे कार्य पुढे घेऊन जाणारे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या कुटुंबाचे योगदान कायम अनमोल राहिले आहे. त्या अनुषंगाने संस्थेला शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी देणगी रूपाने विशेष योगदान देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला रामशेठ ठाकूर तसेच ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्सच्या वतीने सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूलचे चेअरमन व पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांना हजारो रयत सेवकांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमिताने राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना संस्थेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संस्थेच्या विविध शाखांमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक विकास करून समाजाच्या विकासामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या विविध शाखांना कर्मवीर पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर माध्यमिक आणि महाविद्यालय स्तरावर शैक्षणिक, सामाजिक, संशोधनात्मक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्राध्यापक व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. याशिवाय क्रीडा क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करून संस्थेचा लौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांनाही गौरविण्यात आले. संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा मनोगतातून मांडला, तर प्रास्ताविक संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले.

## इयत्ता अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया; नियमित कॅप फेरी-१चे वेळापत्रक जाहीर

प्रवेश निश्चित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी २६ ते २८ मेदरम्यान संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात उपस्थित राहून कागदपत्र पडताळणी व शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. त्यानंतर २९ मे रोजी रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार असून ३० मे रोजी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेतील माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी support@mahafyjcadmissions.in या ई-मेलवर संपर्क साधता येणार असून ८५३०९५५५६४ हा हेल्पलाइन क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## शिक्षणाच्या पुनःसंधी कार्यक्रमातून ४५७ अंगणवाडीताईंनी मिळविले यश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या संकल्पनेतून महिला व बालकल्याण विभाग, माध्यमिक शिक्षण विभाग व प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये रायगड जिल्ह्यात "शिक्षणाची पुनःसंधी" (सेकंड चान्स प्रोग्राम) हा उपक्रम राबविण्यात आला.


या कार्यक्रमांतर्गत विविध कारणांमुळे शिक्षण अपूर्ण राहिलेल्या महिला व मुलींना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून इयत्ता १० वी पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. सदर उपक्रमांतर्गत १८८ अंगणवाडी सेविकांनी १० वीची परीक्षा दिली होती व त्यापैकी १८१ सेविकांनी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. तसेच २९४ अंगणवाडी मदतनीसांनी परीक्षा दिली व त्यापैकी २७६



मदतनीसांनी यशस्वीपणे १० वी उत्तीर्ण केली आहे. याशिवाय २५ इतर महिलांनीही या उपक्रमाच्या सहाय्याने १० वीची परीक्षा दिली व त्या उत्तीर्ण ही झाल्या.

यासाठी १७ नंबर फॉर्म भरून महिलांना बोर्ड परीक्षेस बसण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व शैक्षणिक सहाय्य करण्यात आले. ऑगस्ट २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये आठवड्यातील ५ दिवस, दररोज ४ तास, मोबाईल अॅपद्वारे दहावीचा अभ्यासक्रम शिकवण्यात आला. तसेच दर शनिवारी विविध माध्यमिक शाळांमध्ये प्रत्यक्ष मार्गदर्शन व सराव करण्यात आले. दर महिन्याला बोर्डाच्या परीक्षा पेपरच्या सराव चाचण्या घेण्यात आल्या.

या यशामुळे महिलांमध्ये नव्या आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली. शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबनाचा मार्ग दृढ झाला आहे. तसेच त्यांनी पुढील शिक्षण नियमित करण्यासाठी प्रेरणा प्राप्त झाली असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महिला व बालकल्याण विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे तसेच प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.


भारत सरकार
महाराष्ट्र शासन
सोमनाथ
सोमलिङ्गं नरो दृष्ट्वा सर्वपापैः प्रमुच्यते।
लभते फलं मनोवाञ्छितं मृतः स्वर्गं समाश्रयेत्॥
सोमनाथ
७५ वर्षे गौरवशाली वारशाची
सोमनाथ हे भारताच्या समृद्ध संस्कृतीचे प्रतीक आहे. हजारो वर्षांपासून विध्वंसक आक्रमणांना सामोरे जाऊनही सोमनाथ आजही आपल्या अभिमान आणि शौर्याचे प्रतीक म्हणून अढळपणे उभे आहे.
७५ वर्षांपूर्वी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दृढ संकल्पामुळे आधुनिक सोमनाथाच्या पुनरुत्थानाचा मार्ग सुरळीत झाला. आज प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ही पवित्र भूमी भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाची गौरवशाली साक्ष देत आहे.
या सुवर्णमयी ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा!
मुख्य उपक्रम
कलश यात्रा | भजन संध्या | ओंकार मंत्राचे सामूहिक जप
सोमनाथ पुस्तिकेमध्ये मंत्र लेखन | सोमनाथाशी संबंधित कथांचे कथन
श्री सोमनाथ मंदिर परिसर, प्रभास पाटण | ८ ते ११ मे, २०२६
“सोमनाथ ही अशी यशोगाथा आहे जी आपल्याला शिकवते की सृजनाची शक्ती ही विध्वंसाच्या शक्तीपेक्षा कितीतरी अधिक महान असते.”
प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी (अध्यक्ष, श्री सोमनाथ ट्रस्ट)
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
सोमनाथच्या गौरवशाली १००० वर्षांचा वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी योगदान द्या.
येथे स्कॅन करा

# काला पानी @ ६८

## राज खोसला आणि देव आनंद जोडीची रहस्यरंजकता...



झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

दिग्दर्शक राज खोसला यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरु आहे. जन्म ३१ मे १९२५. आणि मृत्यू ९ जून १९९१. याच त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त दक्षिण मुंबईतील कुलाबा येथील रिगल चित्रपटगृहात त्यांनी दिग्दर्शित केलेल्या सीआयडी., मेरा गाव मेरा देश अशा काही चित्रपटांच्या खेळाचे आयोजन करण्यात आले असता त्या खेळांना मागील पिढीतील चित्रपट रसिकांप्रमाणेच आजच्या ग्लोबल युगातील झेन जी पिढीतील चित्रपट रसिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. काही काही चित्रपट पडद्यावरुन उतरले तरी ते कालबाह्य होत नाहीत. चित्रपट संस्कृतीतील ही एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आहे.

असाच एक चित्रपट नवकेतन फिल्म निर्मित आणि राज खोसला दिग्दर्शित 'काला पानी' (मुंबईत प्रदर्शित ९ मे १९५८). एक संगीतमय रहस्यमय चित्रपट. पूर्वीच्या काळात रहस्यमय चित्रपट असो, भयकथा असो, भूतकथा असो, त्यात गीत संगीत एक मोठीच जमेची बाजू असे. त्या काळातील दिग्दर्शक त्याबाबत विशेष जागरूक असत.


देव आनंदच्या वाटचालीत दिग्दर्शक चेतन आनंद, राज खोसला आणि विजय आनंद यांचा अतिशय महत्त्वाचा फंडा. विजय आनंदच्या दिग्दर्शनातील देव आनंद म्हणताक्षणीच चित्रपट रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या डोळ्यासमोर नौ दो ग्यारह (१९५७)पासूनचे या जोडीचे अनेक चित्रपट येताना देव आनंदचं रूपडं, स्टाईल, इमेज, लोकप्रियता इतकेच नव्हे तर त्याच्या अभिनयातील मर्यादा हे सगळेच विचारात घेऊन विजय आनंदने त्याला तेरे घर के सामने, ज्वेल थीफ, जॉनी मेरा भारत, तेरे मेरे सपने, छुपा रुस्तम इत्यादीत कसा रुपेरी पडद्यावर साकारला आणि 'गाईड'मध्ये त्याच्यातील अभिनय क्षमताही दाखवली हे आले असेल. त्या काळातील अनेक चित्रपट रसिकांच्या एका पिढीतून पुढील पिढीत जात राहिले. चित्रपट अभ्यासात या गोष्टीची विशेष नोंद व्हायला हवी.

राज खोसलाच्या दिग्दर्शनातील देव आनंद हाही बहुरंगी प्रवास. अगदी 'मिलाप' (१९५५) पासूनचा. म्हणजे कृष्ण धवल अर्थात ब्लॅंक ॲण्ड व्हाईट चित्रपटाच्या काळापासूनचा!


याच जोडीचा रहस्यरंजक चित्रपट 'काला पानी'च्या प्रदर्शनास ६८ वर्ष झालीदेखील. आजही त्याच्या लोकप्रिय गाण्यांची खुमारी कायम आहे. रेडिओ ते डिजिटल युग असा या गाण्यांचा प्रवास सुरू आहे.

चित्रपटाची निर्मिती नवकेतन फिल्म बॅनरखाली झालेली. सुरुवातीच्या काळात नवकेतन फिल्मचे कार्यालय असलेला महालक्ष्मी येथील फेमस स्टुडिओ अलिकडेच पाडण्यात आला आणि जुन्या मुंबईतील एक वैशिष्टचपूर्ण गोष्ट काळाच्या पडद्याआड गेली.

'काला पानी'च्या कथाआशयात नायक करण मेहरा (देव आनंद) आपले तुरुंगात शिक्षा भोगत असलेले वडील कसे निरपराध (निर्दोष) आहेत याचा शोध घेतो असे मध्यवर्ती सूत्र आहे. करणला त्याची आई सांगते की त्याच्या लहानपणीच त्याच्या वडीलांचे निधन झाले, पण अमरला हे खरे वाटत नसते. तो या प्रकरणाचा शोध घ्यायचे ठरवतो आणि आपल्या पित्याच्या बाजूने साक्ष देणाऱ्यांचा शोध घेतो. त्यात त्याला पोलीस इन्स्पेक्टर मेहता भेटतो आणि या एकूणच प्रकरणाबाबत एका डायरीतून बरीच माहिती मिळेल असे सांगतो. त्या डायरीचा शोध यावर रहस्यरंजकता खुलते. अमरची आशा (मधुबाला) हिच्याशी ओळख आणि मग प्रेम प्रकरण घडते. ती पत्रकार असते आणि ती अमरला बरीच मदत करते. चित्रपटाच्या अखेरीस सत्य बाहेर येते आणि अमरचे वडील जेलबाहेर येतात. त्या काळात अशा रहस्यमय गोष्टींचे चित्रपट रसिकांना विशेष आकर्षण असे.







'काला पानी'च्या अनुभवाबद्दल नलिनी जयवंतनी एका मुलाखतीत म्हटलं होतं, या चित्रपटाचे शूटिंग देव आनंदने अतिशय झपाट्याने सुरू केले. गोरेगावच्या फिल्मीस्थान स्टुडिओत रात्रंदिवस अठ्ठावीस दिवस काम करीत त्याने बराचसा चित्रपट पूर्ण केला. राज खोसलांचे पेपरवर्कही उत्तम होते. देव आनंदच्या अथक काम करण्याच्या पद्धतीकडे पाहून नलिनी जयवंतही आश्चर्यचकित झाल्या. याच चित्रीकरणात नलिनी जयवंत यांच्यावरील बरीच दृश्य चित्रीत झाली. देव आनंदच्या शिस्तबद्ध काम करण्याच्या पध्दतीमुळे नलिनी जयवंतना बरीच मेहनत करावी लागली तरी चित्रपटाच्या रशेस पाहिल्यावर आपल्या मेहनतीचे चीज झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या चित्रपटाच्या चित्रीकरण काळातच राज खोसला यांच्या मुलाचे निधन झाल्यावर आता काय करायचे असा प्रश्न निर्माण होताच देव आनंदने विजय आनंदकडे काही काळ जबाबदारी सोपवली. चित्रपटात किशोर साहू, प्रवीण पॉल, आगा, मुकरी, नासिर हुसेन, कृष्ण धवन, जानकीदास, मुमताज बेगम, हीरा सावंत यांच्याही भूमिका.

दिग्दर्शक राज खोसलांच्या चित्रपटातील गीत संगीत ही एक छान जमून येणारी गोष्ट. दृश्य माध्यमावर पकड असलेला दिग्दर्शक ही त्यांची ओळख.

पटकथेत त्या गाण्यांना योग्य स्थान (गाण्यांसह चित्रपट पुढे सरकणे), गाणी ऐकावयास श्रवणीय आणि पडद्यावर पाह्यलाही आकर्षक. म्हणून तर त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील अनेक गाजलेली अनेक गाणी आजही लोकप्रिय आहेत.

'काला पानी'ची गाणी मजरुह सुल्तानपुरी यांची तर संगीत सचिन देव बर्मन यांचे. 'अच्छा जी मे हारी चलो मान जाओना' गाण्यातील देव आनंद व मधुबाला यांच्यातील छेडछाड, खट्याळपणा रंगतदार. आशा भोसले आणि मोहम्मद रफी काय भन्नाट गायलेत.

'दिलवाले अब तेरी गली तक' गाण्यातील दोघांचे वेषांतर आणि नृत्यही लाजवाब. जब नाम मोहब्बत ले के (आशा भोसले), दिल लगाके कदर गयी प्यारे (आशा भोसले), हम बेखुदी मे तुमको पुकारे चले गये (मोहम्मद रफी) ही या चित्रपटातील आणखी काही गाणी. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटांचा रंग काही वेगळाच असे आणि त्याचा दिग्दर्शक व छायाचित्रणकार खुबीने वापर करीत. चित्रपट निर्मितीत प्रेक्षक जास्त डोळ्यासमोर असे. निर्मितीचा खर्च आणि फायद्याचे गणित कुठेही नसे.

हा चित्रपट ए.जे. क्रोनिन यांच्या 'बीयॉण्ड दीस प्लेस' या चित्रपटावर आधारित होता. त्याचे भारतीयकरण आनंद पॉल यांनी केले. ग.रा. कामत यांनी पटकथा लिहिली. त्यांची राज खोसला यांच्याशी छान जोडी जमली होती. (जोडीने मेरा साया, दो रास्ते, मेरा गाव मेरा देश असे अनेक चित्रपट दिले.), तर संवाद भप्पी सोनी यांचे होते. कालांतराने ते दिग्दर्शक म्हणून कार्यरत झाले. एखादा दिग्दर्शक असा घडत घडत जातो.

राज खोसला आणि देव आनंद पंजाबमधील गुरदासपुरचे. अर्थात बालपणीचे मित्र. दोघांचा मुंबईतील आणि चित्रपटसृष्टीतील प्रवास खूपच मोठा आणि वळणावळणाचा. त्यात संघर्ष आणि काही अडथळेही आले.

देव आनंदनेच त्याला 'बाझी'च्या वेळेस गुरुदत्तकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून संधी दिली. (आणि त्याचं गायक बनण्याचे स्वप्न मागे पडले. त्याने गायनात के.एल. सैगलचा आदर्श ठेवला होता. थोडीफार गायची संधीही मिळाली.) 'बाजी'नंतर 'जाल' व 'बाज' या चित्रपटांसाठी राज खोसला गुरूदत्तचा सहाय्यक दिग्दर्शक होता. निर्माता फतेहचंद बारीक यांनी त्याला 'मिलाप'पासून स्वतंत्रपणे चित्रपट दिग्दर्शनाची संधी दिली. पहिल्याच दिग्दर्शनातील चित्रपटात अर्थात देव आनंद होताच, जोडीला गीताबाली. 'काला पानी' हा राज खोसला व देव आनंद जोडीचा 'सीआयडी.' व 'सोलवाह साल'नंतरचा चित्रपट. त्यानंतर ही जोडी 'बम्बई का बाबू' आणि त्यानंतर खूप वर्षांनी 'शरीफ बदमाश'साठी एकत्र आली.

दरम्यान, राज खोसलांनी आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटातील थीममधील केवढी तरी विविधता वाढवली. 'काला पानी', 'मेरा साया' रहस्यरंजक होते, तर 'मेरा गाव मेरा देश' डाकूपट, 'वह कौन थी', 'अनिता' रहस्यपट, तर 'दो रास्ते', 'मैं तुलसी तेरे आंगन की' सामाजिक. खरंतर राज खोसलाच्या चित्रपटांवर वेगळा फोकस हवा. त्याच्या 'नकाब'च्या निमित्ताने खारच्या त्याच्या निवासस्थानी अतिशय सविस्तर मुलाखतीचा योग आला असता त्यानी फ्लॅशबॅकमध्ये जात अनेक गोष्टी सांगितल्या. त्यातील एक म्हणजे, देव आनंद त्याचा बालमित्र होता तरी 'शरीफ बदमाश'च्या वेळेस त्यांचे पटकथाकार के.ए. नारायण यांच्यासंदर्भात काही बिनसले. नारायण यांच्या पटकथेनुसार आपल्याला जाता येत नाही असं राज खोसलाचं म्हणणं होतं. विजय आनंद दिग्दर्शित 'ज्वेल थीफ' (१९६७) आणि 'जॉनी मेरा नाम' ( १९७०)च्या यशापासून के.ए. नारायण 'स्टार' पटकथाकार म्हणून ओळखले जात. राज खोसला यांनी या सगळ्यात 'शरीफ बदमाश'कडे काहीसं दुर्लक्ष केले आणि 'कच्चे धागे'वर सगळे लक्ष केंद्रित केले. त्यात राज खोसलांचा आवडता व्हीके (अर्थात विनोद खन्ना) होता. देव आनंदने आपल्या खेळकर शैलीत राज खोसलाची समजून काढायची ठरवले व तो चक्क 'कच्चे धागे'च्या सेटवर गेला. त्यात तो यशस्वी ठरला. राज खोसलाने आपल्याला हवे तसे 'शरीफ बदमाश'मध्ये बदल केले. यात सगळाच रंग उडाला आणि त्यात हा क्राईम थ्रीलर रंगला नाही. याचा परिणाम अर्थात पिक्चर फ्लॉप होण्यात झाला. हे दोन्ही चित्रपट १९७३ साली प्रदर्शित झाले.

'काला पानी'च्या प्रदर्शनास ६८ वर्ष पूर्ण होत असतानाच राज खोसला व देव आनंद जोडीवर हा एक फोकस. चित्रपट रसिकांच्या किमान तीन पिढ्या एव्हाना जुन्या आठवणीत गेले असतीलच, एका पिढीला आपण हा चित्रपट मॅटीनी शोला पाहिल्याचे आठवेल तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने यू ट्यूबवर हा रहस्यरंजक चित्रपट एन्जॉय करायचे ठरवलेही असेल. जुन्या काळातील चित्रपटांची दखल ही अशी अनेक पिढ्यांना जोडते... देव आनंदच्या चाहत्यांना असे जुने चित्रपट सुखावतात. त्यांना तो देव आनंद जास्त आवडतो.

---

## इतिहास संशोधक निनाद बेडेकर



निनाद बेडेकर हे इतिहास संशोधक, शिवचरित्र आणि मराठेशाहीच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक, लेखक आणि प्रभावी वक्ते होते. त्यांचा जन्म १७ ऑगस्ट १९४९ रोजी पुण्यामध्ये झाला. मॉडर्न शाळेतील शिक्षणानंतर त्यांनी शासकीय तंत्रनिकेतन येथून अभियांत्रिकी अभ्यासक्रम पूर्ण केला. शिवचरित्राची गोडी लागल्याने बेडेकर इतिहास संशोधनाकडे वळले.

इतिहासाच्या अभ्यासासाठी त्यांनी मोडी, फार्सी, उर्दू या लिपींवर प्रभुत्व मिळविले. या लिपीमध्ये असलेली हस्तलिखिते आणि कागदपत्रांचे वाचन करून त्यांनी साहित्यनिर्मिती केली. त्याचबरोबरीने बेडेकर यांनी पर्शियन, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्रजी या परकीय भाषा आत्मसात केल्या. शिवचरित्र आणि १८व्या शतकात देशभर विस्तारलेले मराठी साम्राज्य या विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास होता.

राज्यातील आणि देशातील किल्ल्यांवर भ्रमंती करून शिवकालीन इतिहासामध्ये ते रममाण झाले होते. शिवरायांचा राज्यकारभार आणि मराठेशाही संदर्भात त्यांनी वेगळ्या दृष्टिकोनातून लेखन केले. शिवाजी महाराजांचे युद्धकौशल्य, नेतृत्वगुण, दुर्गबांधणी, आरमार उभारणी या पैलूंचा स्वतंत्रपणे अभ्यास करून त्यांनी लेखन केले होते.

छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठेशाहीच्या इतिहासावर अधिकारवाणीने बोलू शकणारे निनाद बेडेकर यांची शिवचरित्राचे सव्यसाची अभ्यासक अशी ख्याती होती. गड–किल्ल्यांच्या जतन–संवर्धनासाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून निनाद बेडेकर यांची नियुक्ती झाली होती.

लालित्यपूर्ण शैलीमध्ये ऐतिहासिक लेखन करणाऱ्या बेडेकर यांची 'शिवभूषण', 'थोरलं राजं सांगून गेलं', 'गजकथा', 'हसरा इतिहास', 'दुर्गकथा', 'विजयदुर्गचे रहस्य', 'समरांगण' आणि 'झंझावात' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी ३५ पुस्तकांसह शेकडो लेख आणि शोधनिबंध लिहिले. निनाद बेडेकर यांना शिवभूषण, दुर्ग साहित्य पुरस्कार, जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार, पुराण पुरुष पुरस्कार, शिवपुण्यतिथी रायगड पुरस्कार या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. अशा या प्रख्यात इतिहासकाराचे १० मे २०१५ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

---

# आई : निस्वार्थ प्रेमाचे मूर्तिमंत रूप



काल–परवाची घटना आहे जबलपूर येथे नौका विहार करण्यासाठी पर्यटक बोटीमध्ये आनंदाने बसले होते. ते नौकाविहाराचा आनंद घेत होते. सर्वच प्रवासी खूपच आनंदी होते. सुरक्षा म्हणून बोटीमध्ये प्रत्येकाला सुरक्षा कवचसुद्धा देण्यात आले होते. बोटीने नेहमीप्रमाणे किनारा सोडला आणि बोट आता पाण्याच्या मध्यभागी आली. नेहमीप्रमाणे बोट अर्थात खचाखच भरलेली होती. सर्वजण पर्यटनाचा आनंद लुटत होते आणि अचानक बोट उलटली. सर्वांकडे लाईव्ह जॅकेट होते. या बोटीत एक महिला आणि तिचा छोटा मुलगासुद्धा पर्यटक म्हणून प्रवासी होते. जेव्हा ही बोट उलटली तेव्हा या महिलेने लाइफ जॅकेट परिधान करूनसुद्धा आपल्या बाळाला घट्ट मिठी मारली आणि त्या बाळाला सोडले नाही.

असे म्हणतात की जर त्या महिलेने मुलाला सोडले असते, तर ती कदाचित त्या सुरक्षा कवचने स्वतःचे प्राण वाचवू शकली असती, परंतु तसे झाले नाही. या माऊलीने स्वतःच्या प्राणाची आहुती दिली, पण शेवटच्या श्वासापर्यंत तिने आपल्या बाळाची साथ सोडली नाही. हे खरं प्रेम. ज्याला म्हणतात जीवाला जीव देणे. तिने बाळाला वाचवण्यासाठी आटोकात प्रयत्न केले. त्यात ती यशस्वी नाही झाली व तिच्या या मातृप्रेमामुळे जगाला परत एकदा तिने संदेश दिला की मातृप्रेम काय असते, ममता काय असते. किती आया या आपल्या लेकरावर प्रेम करतात. तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्या लेकरांची काळजी घेतात. संपूर्ण जग हळहळलं. परत एकदा सर्वात श्रेष्ठ कुठलं प्रेम तर आईचं हे पुन्हा एकदा सिद्ध झालं.

विश्वात मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मदर्स डे साजरा केला जातो. या दिवशी आपल्या आईविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. दरवर्षी विश्वात एक थीम घेऊन मातृदिन साजरा केला जातो. यावर्षीसुद्धा एक आगळीवेगळी थीम घेऊन आपण मातृदिन साजरा करणार आहोत. या २०२६ची थीम" मातृत्व पिढ्यांना आकार देणारी जबाबदारी" ही आहे. तसे बघितले तर मातृत्वासाठी हे काही नवीन नाही. खरोखर मातृत्व म्हणजे केवळ मुलांना जन्म देणे एवढ्यापुरते सीमित नाही, तर त्याच्या संपूर्ण आयुष्याची जबाबदारी घेणे, त्याच्यावर संस्कार करणे, त्याला चांगले वळण लावणे ही एवढी मोठी जबाबदारी या मातृत्वावर असते.

तसे बघितले तर आपला भारत देश हा पुरुषप्रधान संस्कृतीला प्रोत्साहन देणारा, वाव देणारा आहे. असा आपल्याला पावलोपावली अनुभव येत असतो. तरीपण महिलांची भूमिका ही नेहमी उल्लेखनीय राहिलेली आहे. त्यांचा संघर्ष व समर्पणाचा भाव हा नक्कीच दुसऱ्यांसाठी मदतगार राहिला आहे.

आईच्या प्रोत्साहनामुळे मोठमोठी व्यक्तिमत्व घडलेली आहेत. आपल्या संस्कृतीत पहिला आपला गुरू कोण असेल, तर त्यात आईचे स्थान अग्रस्थानी आहे ही खरोखर आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. राजमाता जिजाऊंमुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले. छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये जो आत्मविश्वास निर्माण केला गेला अर्थात तो या जिजाऊंनीच. एका मातेमुळे आपल्या महाराष्ट्राला चांगले नेतृत्व मिळालं हे खरं आहे, ते कोणीही नाकारू शकत नाही

आईचे बलिदान आपल्या अपत्यासाठी फार मोठे आहे. जगाने जरी त्याला नाकारले तरी आईने त्याला कधीच नाकारले नाही. आई नावाच्या विद्यापीठात हा नेहमी सुवर्णपदाचाच मानकरी राहिला आहे, मात्र हा इकडे विश्वाच्या पाठीवर मग ती शाळा असेल, हायस्कूल असेल, महाविद्यालय असेल किंवा विश्वविद्यालय असेल तो इथे मात्र उत्तीर्ण होत नसेल.

असे बरेच मोठमोठे कीर्तिमान व्यक्तिमत्व आहेत, ज्यांना सुरुवातीला जगाने नाकारले आहे, पण त्यांच्या आईने मात्र त्यांच्यावर विश्वास ठेवला आहे आणि त्या मातृत्वात एवढी ताकद होती की त्या मुलाने आईचा विश्वास खरा करून दाखविला आहे. आपल्याला शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसनचे उदाहरण फार चांगले आठवते. एकदा काय झाले शिक्षकांनी त्याच्या घरी पत्र पाठवले. लहानपणी एडिसनचा शाळेत चांगला अभ्यास नव्हता. त्याला अभ्यासात गती नव्हती. त्याला शिक्षकांनी शाळेतून काढून आणि त्याच्या आईला एक पत्र दिले. हा मग एडिसनने त्याच्या आईला विचारले आई शाळेतून काय पत्र आले. त्याच्या आईने ते पत्र एडिसनला मोठ्याने वाचून दाखवले आणि म्हटले की, तू खूप हुशार आहेस. त्यामुळे तुला शाळेत शिकवणे शक्य नाही, म्हणून त्यांनी तुला घरीच शिकवायला सांगितले. प्रत्यक्षात त्या पत्रात त्याला कमजोर विद्यार्थी म्हटले होते, पण आईने त्याचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी वेगळे सांगितले. त्याच्या आईच्या आत्मविश्वासामुळे एडिसनला वेगळीच प्रेरणा मिळाली. त्याचा आत्मविश्वास वाढला. जगाला एक नवीन शास्त्रज्ञ मिळाला. शास्त्रज्ञ एडिसने बल्बचा शोध लावला. आज जो आपल्याला उजेड मिळाला आहे तो एडिसनमुळेच. जर त्याच्या आईने त्याच्यावर विश्वास दाखवला नसता, तर कदाचित आपण एका मोठ्या शास्त्रज्ञाला मुकलो असतो. अशी शक्ती, जादू मातृत्वात आहे.

या मातृत्वाने अनेक शास्त्रज्ञ प्राध्यापक, इंजिनियर, डॉक्टर, उद्योजक, नेते, आयएएस अधिकारी व राजे–महाराजे दिले आहेत. ही मोठ्या व्यक्तिमत्त्वांची उदाहरणे झाली. अगदी सर्वसामान्याचे उदाहरण घेतले तर आपल्या निदर्शनास येते की आपल्या सामान्य घरच्या मुलांच्या दहावीच्या परीक्षेसाठी दिवसभर काबाडकष्ट करूनसुद्धा रात्रभर जागणारी, मुलाला झोप न येऊ देण्यासाठी चहा करून देणाऱ्या असंख्य आया आपण बघितल्या आहेत. आज असंख्य डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, तहसीलदार अधिकारी आणि उद्योजक आपण बघतो आहोत. हे सर्व कशामुळे तर ते केवळ आईच्या योगदानामुळे.

एवढी महती, एवढी ताकद या मातृत्वात आहे. तरीपण या माऊलीला कधी कधी टोमणे ऐकावे लागतात. हा मुलगा ना, ही मुलगी ना त्याच्या आईमुळे वाया गेली. तिने मुलाचा फाजिल लाड केले नसते तर त्यांची मुलं आज चांगली झाली असती. तेव्हा या माऊलीला खूपच वेदना होतात. सगळा त्याग करूनसुद्धा समाजाचे हे टोमणे झेलावे लागतात.

अगोदरच्या काळी मुलांना धाकधपट, अंगावर हात उचलणे चालत असे. तेव्हा पालक आणि अपत्याला त्याचे काही वाटत नसे. दोघेही समजून घेत असत, परंतु आताच्या मुलांना हे माहीतच नाही. त्यांना रागावले की मुलं खूपच क्रोधित होतात व कधी कधी टोकाचा निर्णय घेतात तेव्हा मातेला काय वाटत असेल?

आपण नेहमी मातृत्वाचे महत्त्व, त्यांच्या कार्याचा उदो उदो करतो, पण या आईच्या श्रावण बाळाचे काय? हे श्रावण बाळ कुठे आहेत? ते आपले कर्तव्य कधी पूर्ण करणार? हे श्रावण बाळ कुठे आहेत? तर ते मोबाईलमध्ये, बियर बारमध्ये, दारूच्या व्यसनामध्ये तल्लीन झालेले एका वेगळ्या दुनियेत अडकलेले आहेत. हे आईला विसरत चाललेले आहेत म्हणून तर वृद्धाश्रम वाढत आहेत. अपत्य असून काही आया पोरक्या झाल्या आहेत. पुत्रप्रेमापोटी काय वाटत असेल या मातेला?

हिच्या मुलाने छोट्यातला छोटा गुन्हा केला तरी त्याला समाजात शिक्षा आहे, परंतु आईच्या कोर्टात मात्र सर्व गुन्हे हे माप आहेत. जगातलं एकमेव असं कोर्ट आहे जिथे मुलांना सर्व गुन्हे माफ आहेत.

आपण बऱ्याच गोष्टी ऐकल्या आहेत, जिथे आईने आपल्या प्राणाची बाजी लावली आहे. हिरकणीची गोष्ट आपल्याला माहीत आहे. ती आपल्या बाळासाठी किती मोठा गड रात्री उतरून आली होती. आजसुद्धा अशा आया आहेत जे आपल्या अपत्यासाठी जीवाचे रान करत असतात. त्यात कुठलाही स्वार्थ नसतो. उद्देश एवढाच असतो की त्याचे भविष्यात भले व्हावे. आता ही आई थकली आहे, ती तिचे कर्तव्य करून. आता श्रावण बाळा जागा हो! आता तुझी बारी आहे तिची काळजी घेण्याची.

हे वर्ष आपण पिढ्यांना आकार देणारी जबाबदारीची थीम घेऊन मातृदिन साजरा करणार आहोत. आजच्या मातृत्वाला मोठे आव्हान आहे की या मोबाईलच्या युगात ती आपल्या बाळाला कशी सुसंस्कृत करेल, कशी घडवेल. अगोदरची आई ही मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी त्याच्या हाती लेखणी देत असे. पुढे जाऊन हे मुल त्याच्या सृजनतेवर नामांकित चित्रकार होत असत, परंतु आताची आई ही मुलांना मोबाईल देऊ शकत नाही हे तिच्यापुढे मोठे आव्हान आहे, पण ती हार मानणारी नाही. ती आपल्या मुलांना काहीतरी मार्ग काढून यशस्वी करेल यात दुमत नाही. मातृत्व दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**–अरविंद मोरे,** नवीन पनवेल

# आमदार प्रवीण दरेकरांच्या भेटीने विकासकामांना बळ; माणगावमध्ये भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह

## युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या कार्यालयाला सदिच्छा भेट; प्रलंबित प्रश्नांवर घेतली खमकी भूमिका



**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे आक्रमक नेतृत्व, विधान परिषद गटनेते तथा महाराष्ट्र स्वयंसमूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा) प्रवीण दरेकर यांनी नुकतीच माणगाव येथे भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या जनसंपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी ढोलताशांच्या गजरात आणि घोषणाबाजी करीत दरेकर यांचे अत्यंत उत्साहात व जल्लोषात स्वागत केले.

महाड दौऱ्यावर जात असताना आमदार प्रवीण दरेकर यांनी निलेश थोरे यांच्या कार्यालयाला भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. पुष्पहार आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. ही केवळ सदिच्छा भेट नसून माणगावच्या विकासासाठी एक आश्वासक पाऊल असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. या भेटीदरम्यान जिल्हाध्य निलेश थोरे यांनी माणगाव तालुक्यातील जिव्हाळ्याचे प्रश्न मांडले. प्रामुख्याने माणगाव शहरातील वाढती ट्रॅफिकची समस्या, ग्रामीण भागातील लोडशेडिंगचा खोळंबा आणि गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली विकासकामे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदार दरेकर यांनी सर्व प्रश्न शांतपणे ऐकून घेतले व माणगावच्या विकासासाठी आणि येथील जनतेच्या न्याय्य हक्कासाठी मी सरकार दरबारी खंबीरपणे पाठपुरावा करेन. जनतेसाठी माझे दरवाजे सदैव उघडे आहेत, असे आश्वासन दिले. या सोहळ्याला भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीनदादा म्हामुणकर, जिल्हा चिटणीस गोविंद कासार, तालुकाध्यक्ष परेश सांगले, सरचिटणीस किसन महाडिक, उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, बापूसाहेब सोनगीरे, महाड शहराध्यक्ष सुनीलआप्पा सोंडकर, युवामोर्चा सरचिटणीस श्रीराम कळंबे, माजी सरपंच संतोष कळंबे, कृष्णाजी मोंडे, विजय पेणकर, अमोल पवार, समीर पवार, राजेश पवार, संतोष महाराज पवार, नयन पोटले, किसान मोर्चा अध्यक्ष साईनाथ पेणकर, पंकज लहाने, ओमकार गायकवाड, हरिभाऊ पवार, भारती सुतार यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

निलेश थोरे यांच्या नेतृत्वाखाली युवा मोर्चाने केलेल्या नियोजनाचे आमदार दरेकर यांनी कौतुक केले. या भेटीमुळे माणगाव तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात विकासकामांचा धडाका लावण्यासाठी सर्वांनी कंबर कसली आहे.

## मोर्बा एस.एस. हायस्कूलचा उर्दू विभागाचा निकाल ९२.१४%, तर मराठीचा ८४.८४%

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२६मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल ८ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. यात माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील मोर्बा सोशल सोसायटीच्या एस. एस. हायस्कूल मोर्बा या शाळेच्या उर्दू माध्यमाचा एकूण निकाल ९२.१४ टक्के तर मराठी माध्यमाचा एकूण निकाल ८४.८४ टक्के लागला. शाळेने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. उर्दू माध्यमातून कु. उजमा अमीन बंदरकर या विद्यर्थिनीने ९४.८० टक्के गुण संपादन करून प्रथम क्रमांक मिळविला असून मराठी माध्यमातून कु. निधी गोठल या विद्यार्थिनीने ७९ टक्के गुण संपादन करून प्रथम क्रमांक मिळविला आहे.

उर्दू माध्यमातून अलिना रईस धनसे ९०.४० टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, कु. रुखसार सादूलखान पठाण या विद्यार्थिनीने ८६.४० टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक, कु.खदिजा मुजफ्फर बंदरकर ८१.६० टक्के चतुर्थ क्रमांक, झोया मोहसीन चिलवान ८०.६० टक्के पाचवा क्रमांक,सोलीया मुरादअली करदेकर ८०.४० टक्के पाचवा क्रमांक पटकावला आहे. तर मराठी माध्यमातून कु. अनुषा मुरकर व सृष्टी पवार या विद्यार्थिनींनी अनुक्रमे ७५.६० टक्के गुण संपादन करून द्वितीय क्रमांक मिळविला. कु. गीतांजली बनारस सिंग या विद्यार्थिनीने ७१.२० टक्के गुण संपादन करून तृतीय क्रमांक, अनुष्का सुशील मोरे या विद्यार्थिनीने ६४.६० टक्के चतुर्थ क्रमांक, पायल रवींद्र सावंत या विद्यार्थिनीने ६३.२० टक्के पाचवा क्रमांक पटकावला आहे. या संस्थेच्या उर्दू माध्यमाच्या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण १४० विद्यार्थी बसले होते त्यापैकी १२९ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले असून विशेष प्राविण्य १४ विद्यार्थी,प्रथम श्रेणीत २८ विद्यार्थी,द्वितीय श्रेणीत ५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर मराठी माध्यमातून एकूण ३३ विद्यार्थी दहावी परीक्षेला बसले होते त्यापैकी २८ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेचा निकाल दरवर्षी नेत्रदीपक लागत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.सैफुद्दीन धनसे,सेक्रेटरी अस्लम राऊत,शाळा समिती चेअरमन अ.कादीर इब्राहिम हर्णेकर,संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासद,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी आसफ पल्लवकर,प्राचार्य खालिद अहंमद रशीद खान, सर्व शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अशोक लोखंडे यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे

## माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे प्रतिपादन



**मुरुड : प्रतिनिधी**

समाजासाठी कार्य करणारे व समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी नेहमी अग्रेसर असणारे अशोक लोखंडे यांचा आदर्शवत संपूर्ण ग्रामीण भागात असून त्यांनी केलेले समाजकार्य आजच्या भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे नवी दिशा दाखवून देण्याचे कार्य करून आजच्या भावी पिढीला प्रेरणादायी ठरेल. या कार्यामधूनच समाजाप्रति प्रेम आपुलकी असणारा वर्ग वृद्धींगत होऊन सामाजिक कार्याचा वारसा चालवण्याची संख्या वाढून एक निकोप सामाजिक सेवा तरुणांकडून घडून येईल, असा विश्वास माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी व्यक्त केला आहे. पीटसई विभाग प्रसारक मंडळ पीटसई यांच्या विद्यमाने कै. अशोक लोखंडे यांचा ३८ वा स्मृतिदिन समारंभ पीटसई विद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे आपल्या मार्गदर्शन भाषणात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर. विश्वस्त वसंत लोखंडे, विश्वस्त महादेव गोळे, अध्यक्ष गणपत जगताप, मनोहर गायकवाड व उपाध्यक्ष लक्ष्मण मनवल गुरुजी, कृष्णा पंदेरे गुरुजी, माजी चेअरमन खेळू वाजे, रामचंद्र अडखळे, दीपक शिगवण, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, शिर्के गुरुजी, महिला अध्यक्ष जान्हवी शिंदे, पंचायत समिती सदस्य अक्षरा कदम, सभापती चंद्रकांत मुकणे, तालुका अध्यक्ष नाना भौड, मुख्याध्यापक अरुण खुळपे सर,ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी सर उपसरपंच नागेश लोखंडे, युवक अध्यक्ष देवा रामाने, विभागीय अध्यक्ष जगदीश शिंदे, मंगेश भगत, माजी उपसभापती गणेश वाघमारे, विमलताई जगताप रमेश पिंपळे, आदी मान्यवर उपस्थित होते. अनिकेत तटकरे यांनी ३८ वर्ष होऊनही मोठ्या उत्साहाने स्मृतीदिन साजरा होणे म्हणजे त्यांचे कर्तृत्व अधोरेखित करत त्यांच्याबद्दल असणारे अविरत प्रेम दर्शविणारे आहे. आगामी काळात शिक्षण क्षेत्रात शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य पुरविणार असून पीटसई हायस्कूलसाठी साजेशी कमान करणार असल्याचे अभिवचन यावेळी त्यांनी दिले.

## एम.बी. मोरे फाउंडेशन इंग्लिश मीडियम स्कूलचे यश

**रोहा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे (SSC) घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, एम. बी. मोरे फाउंडेशन इंग्लिश मीडियम स्कूलने आपल्या देदीप्यमान यशाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. शाळेचा निकाल १००% लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

या परीक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत यश मिळवले आहे. यात कुमारी विधी विकास महाबळे हिने ९२.००% गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. तसेच कुमारी मुस्कान याकूब शेख हिने ८४.८०% गुणांसह द्वितीय, तर कुमारी ऋतुजा संदीप इंगळे हिने ८३.४०% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बोलताना शाळेचे मुख्याध्यापक व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. "विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांनी दिलेला खंबीर पाठिंबा या त्रिसूत्रीमुळेच हे यश शक्य झाले आहे," अशा भावना शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या.

यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या निकालाने एम. बी. मोरे फाउंडेशनच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले असून, विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.


**जाहिर प्रगटन**

**कंधार येथील तदर्थ जिल्हा न्यायाधिश-1 यांच्या न्यायालयात**

**मोटार अपघात दावा क्र.** 75/2025

**अर्चना व ईतर**

**विरुध्द**

**प्रभाकर व ईतर ०1**

ज्या अर्थी अर्जदार अर्चना देविदास गायकवाड व ईतर यांनी Petition U/S 166 of M.V. Act 1988 अन्वये MACP No. 75/2025 बाबतचा दाव्यामध्ये त्यांचे विधीज्ञ श्री. सय्यद शकील अहमद, यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी उपरोक्त खटल्यात प्रतिवादी क्र. 1 Prabhakar karbhari Misal age- Major Occu- Business and owner of Container No.MH-46/CL-9195 R/o Flat No. 305 2nd floor A wing Anukul Residency Usarli Khurd Panvel Raigarh -410206.

सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे. तरी दिनांक 19/06/2026 रोजी सकाळी ठिक 11:00 वाजता आपण स्वतः जातीने किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात हजर राहुन आपले लेखी म्हणणे मांडावे, आपण जर नमूद तारखेस या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक 08 माहे 05 सन 2026 रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**क. लिपिक**
**दिवाणी विभाग**
**तदर्थ जिल्हा न्यायालय कंधार**

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय-1 कंधार**


# कारमेल शाळेमध्ये मधुरा ढवळे ९६.८० टक्के गुण मिळवून प्रथम

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत येथील कारमेल कॉन्व्हेंट स्कूलची विद्यार्थिनी मधुरा सचिन ढवळे हिने ९६.८० टक्के गुण मिळवून शाळेमध्ये पहिला येण्याचा मान पटकावला आहे. तसेच खोपोली व तालुक्यामध्ये ती दुसरी आली आहे. शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

अग्रणी देवकाते आणि वरदा गाडगीळ या ९६.६० टक्के गुण मिळवून दुसऱ्या आल्या. तर मन्नत मिश्रा ही ९६ टक्के गुण मिळवून शाळेमध्ये तिसरी आली. हल्ली मुलांना पहिली पासूनच खाजगी शिकवणी लावायची पद्धत आहे. त्यातही दहावी म्हणलं की विद्यार्थ्यांचा खाजगी शिकवणी लावण्याकडे कल असतो. परंतु खोपोलीच्या शास्त्रीनगरमध्ये राहणारी मधुरा सचिन ढवळे हिने आत्तापर्यंत कोणतीही खाजगी शिकवणी लावलेली नाही व तरीही तिने शाळेमध्ये पहिला येण्याचा बहुमान मिळवला आहे.याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.पाचवीपासून तिला सतत वर्गामध्ये पहिला क्रमांक मिळत आहे. ती उत्कृष्ट भरत नाट्य करते.हल्ली परीक्षेपूर्वी शाळेला दांडी मारून अभ्यास करायची पद्धत रूढ होत असतानाच मधुरा मात्र शेवटच्या दिवसापर्यंत शाळेमध्ये उपस्थित होती. मधुरा शाळेतील आदर्श विद्यार्थिनी आहे. मधुराने कोणतीही खाजगी शिकवणी न लावता फक्त घरी अभ्यास करून मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे व तिच्या कुटुंबीयांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# रेवदंडा, अलिबाग परिसरात नारळ-शहाळे बाजार तेजीत



**अलिबाग : प्रतिनिधी**

एप्रिल, मे महिन्यात वाढलेल्या उष्णतेमुळे अलिबाग व रेवदंडा परिसरात नारळ व शहाळे पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. समुद्रकिनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटकांसह स्थानिक नागरिकांकडूनही शहाळे पाण्याला मोठी पसंती मिळत असून विक्रेत्यांची चांगली उलाढाल होत आहे.

सध्या बाजारात शहाळ्याचे दर ५० ते १०० प्रतिनगदरम्यान असून सुक्या नारळाचे दर ३० ते ७०पर्यंत आहेत. उन्हाची तीव्रता आणि पर्यटकांची संख्या यानुसार दरात चढ-उतार होत असल्याचे विक्रेत्यांनी बोलताना सांगितले.

नागाव, आक्षी, काशिद या समुद्रकिनाऱ्यांवर दररोज मोठ्या प्रमाणात शहाळ्यांची विक्री होत असून अनेक विक्रेते थेट शेतकऱ्यांकडून माल घेऊन ग्राहकांना ताजे शहाळे उपलब्ध करून देत आहेत. त्यामुळे स्थानिक शेतकरी व विक्रेत्यांना याचा आर्थिक फायदा होत आहे.

दरम्यान, अलीकडे काही ठिकाणी शहाळ्यात भेसळीच्या घटना समोर आल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात येत आहे. ताजे व आपल्यासमोर उघडलेले शहाळेच खरेदी करावे, असा सल्ला देण्यात येत आहे.

उन्हाळ्यात अलिबाग, रेवदंडा परिसरात नारळ-शहाळे बाजार तेजीत असून पुढील काही दिवसांत मागणी आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## वर्तमानपत्र विक्रेते सतीश कुळकर्णी यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस उत्साहात



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा येथील ज्येष्ठ वर्तमानपत्र विक्रेते सतीश भालचंद्र कुळकर्णी यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, ग्राहकवर्ग तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, अत्यंत कष्टमय आणि मेहनती जीवनप्रवासातून कुळकर्णी यांनी वर्तमानपत्र विक्री व्यवसायात स्वतःची वेगळी अशी ओळख निर्माण केली. त्यांच्या साधेपणा, मेहनत आणि जिद्दीमुळे समाजात त्यांना विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांचे वडील अर्थात 'आप्पा' यांनीही वयाच्या ९२ व्या वर्षापर्यंत अगदी शेवटच्या दिवसापर्यंत कार्यरत राहून कष्ट आणि प्रामाणिकपणाचा आदर्श समाजासमोर ठेवला होता.

कार्यक्रमच्या ठिकाणी कुळकर्णी यांच्या ७५ वर्षांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे दर्शन घडवणारा आकर्षक फलक लावण्यात आला होता. "कठोर मेहनत, सचोटी आणि जिद्दीच्या जोरावर आपण घडवलेला हा समृद्ध जीवनप्रवास आमच्यासाठी सदैव प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे," असा संदेश या फलकावर देण्यात आला होता.


**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil. khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि/एसआर ६८/२०२६,

१) श्री. सदाशिव हरीभाऊ पाटील
रा. लौजी खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड — वादी

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म-मृत्यु नोदणी अधिकारी,
मुख्याधिकारी खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. सदाशिव हरीभाऊ पाटील, रा. लौजी खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांची आजी कै. सोनाबाई हरीभाऊ पाटील यांचा मृत्यू दिनांक ४/२/२०२५ रोजी लौजी खोपोली, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त् न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. ०७/०५/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्कयानिशी दिली असे.

**ठिकाण:- खालापूर**
**दिनांक:- १०/०२/२०२६**

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार खालापूर**

# स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात!

## पनवेल महानगरपालिकेचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत पनवेल शहराला स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात' हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे. महापौर नितीन पाटील यांच्या पुढाकाराने राबवल्या जाणाऱ्या या मोहिमेद्वारे शहरातील कचरा व्यवस्थापन, रस्ते सफाई आणि नागरी सहभागावर विशेष भर दिला जात आहे. या अंर्तगत शनिवारी प्रभाग क्रमांक १८ मधून या मोहिमेचा शुभारंभ झाला.

या उपक्रमांतर्गत ओला व सुका कचरा वर्गीकरण, संकलन आणि दैनंदिन रस्ते झाडलोट कामाची थेट प्रभागात जाऊन पाहणी केली जाणार आहे, जेणेकरून स्वच्छतेच्या कामात पारदर्शकता आणि वेग येईल.



नागरिकांचा सक्रिय सहभाग हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यावेळी पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृहनेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेविका प्रीती जॉर्ज, रुपेश नागवेकर यांच्यासह पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

या मोहिमेत प्रभाग क्रमांक १४ ते २० मधील सुमारे २०० स्वच्छतादूत, पर्यवेक्षक तसेच घंटागाडी विभागातील कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून संपूर्ण प्रभागात एकाच वेळी स्वच्छता उपक्रम राबविण्यात आल्याने मोहिमेला अधिक वेग व परिणामकारकता प्राप्त झाली. या मोहिमेत साफसफाईबरोबरच विविध पूरक उपाययोजनांवरही विशेष भर देण्यात आला. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नाल्यांमधील कचरा काढून पाणी निचरा सुरळीत राहावा यासाठी नाला साफसफाई करण्यात आली. तसेच नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

डासांच्या प्रादुर्भावाला आळा घालण्यासाठी संपूर्ण परिसरात जंतुनाशक धूर फवारणी (फॉगिंग) करण्यात आली. या उपक्रमादरम्यान महापौर नितीन पाटील यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामाची पाहणी केली. "स्वच्छ पनवेल सुंदर पनवेल" हे ध्येय साकार करण्यासाठी नागरिकांनीही स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# करंजाडेतील नवीन स्मशानभूमींच्या बांधकामाचे काम प्रगतिपथावर

- अंतर्गत रस्त्यांवर पुरेसे पथदिवे बसविण्याची मागणी
- भाजप नेते रामेश्वर आंग्रे यांचा पाठपुरावा

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीत एकच स्मशानभूमी असल्यामुळे नातेवाइकांना अंत्यसंस्कारासाठी इतर ठिकाणी जावे लागत होते. याबाबत नवीन स्मशानभूमी बांधावी, अशी स्थानिक नागरिकांची मागणी होती. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सिडकोकडे पाठपुरावा करून सिडकोकडून नवीन बांधकाम सुरू असून त्या बांधकामाचे काम प्रगतिपथावर आहे.



सिडकोने करंजाडे वसाहतीची निर्मिती केली. करंजाडे वसाहतीमध्ये दोन सरण रॅक असलेली स्मशानभूमी आहे. मात्र वसाहतीत वाढती लोकसंख्या आणि जुन्या स्मशानभूमींची अपुरी क्षमता यामुळे नवीन स्मशानभूमीची मागणी जोर धरत आहे. त्याचबरोबर अंत्यसंस्कारासाठी नातेवाइकांना कामोठे किंवा पनवेल महापालिका हद्दीत जावे लागत असल्याने गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप नेते करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सिडकोकडे वारंवार पत्रव्यवहारासह अखंड पाठपुरावा केला होता. अखेर सिडकोकडून नवीन स्मशानभूमीचे बांधकाम व अस्तित्वातील स्मशानभूमीची दुरुस्ती करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. आता अंत्यसंस्कारासाठी गैरसोयीला सामोरे जावे लागणार नाही. स्मशानभूमीच्या मुख्य प्रवेशद्वारावर, अंतर्गत रस्त्यांवर पथदिवे, हायमास्ट दिव्यांची उभारणी करावी. अंत्यसंस्कार ठिकाणी, वेटिंग हॉलमध्ये प्रकाश व्यवस्था करावी, अशी मागणी भाजप नेते रामेश्वर आंग्रे यांनी पत्राद्वारे केली आहे.

# बारवई जि.प. प्राथमिक शाळेत महाराजस्व शिबिर

**नवीन पनवेल : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक १ची अंमलबजावणी करण्याकरता अपर तहसिल पनवेल यांच्या कार्यक्षेत्रात ७ मार्च ते ८ मेदरम्यान मंडळ स्तरावरती एकूण पाच शिबिरांचे आयोजन करण्यात आले. पाचवे व अंतिम शिबिर पोयंजे महसूल मंडळामध्ये रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारवई मैदान येथे ८ मे रोजी ठीक आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल, जितेंद्र इंगळे, अपर तहसीलदार पनवेल, निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार व इतर मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित इतर प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती दिली. तसेच स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून



देण्यात आली. विशेष बाब म्हणुन भिंगार गावच्या स्थानिक महिला बचत गटाच्या भगिनींनी पुढाकार घेवुन तेथे घरगुती उपयोगी वस्तू, धान्य व इतर साहित्य यांचे स्टॉल लावून विक्रीसाठी तरतुद केली. या अभियानात महसूल विभागाकडील सेवा यांची माहिती देण्यात आली व अर्ज दाखल करून घेण्यात आले.

प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा, ८ अ वाटप, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी आदिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा (४२ ते ४७) कलम सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजना लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांना दाखले वाटप, तुकडेबंदी कायदा सुधारणा, पानंद रस्ता, सर्वांसाठी घरे पट्टेवाटप, अ‍ॅग्रीस्टॅग नोंदणी, पी एम किसान नोंदणी, कमी जास्त पत्रक दप्तर अद्यावत, भूमी अभिलेख यांच्याकडील डिजिटल सेवांचा प्रसार व जनजागृती, नगर भूमापन गावठाण भूमापन व स्वामित्व अंतर्गत फेरफार प्रकरणे, भूसंपादन व अकृषीक प्रकरणात कमी जास्त पत्रक तयार करणे, ई मोजणी 2.0 प्रणाली, महाभुमी पोर्टल विषयी जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, पोयंजे मंडळातील सर्व आजी माजी सरपंच व सदस्य , पोलीस पाटील, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, वैशाली पाटील, उपअधीक्षक भूमी अभिलेख नैना प्राधिकरण व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावरील नागरिकांना आवश्यक सर्व वेबसाईटची माहिती दिली. ऑनलाईन सुविधांची माहिती दिली. संभाजी शेलार, निवासी नायब तहसीलदार यांनी महसूलमधील विविध कामांची माहिती दिली. प्रातिनिधीक स्वरुपात जात प्रमाणपत्र, वय, अधिवास प्रमाणपत्र, स्थानिक वास्तव्य प्रमाणपत्र अशा विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.



**पनवेल : तालुक्यातील चिंचवली तर्फे तळोजे येथील भाजप कार्यकर्ते गोटीराम रिकामे यांच्या मुलींच्या जागृती आणि तनुजा विवाहानिमित्त महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर आणि भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह नगरसेवक दिनेश खानावकर, माजी उपसरपंच परशुराम रिकामे, दीपक रिकामे, लहू मुंढे, फुलचंद पाटील, सुरेश रिकामे, संतोष मुंढे, बाळकृष्ण बोलाडे आदींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.**

# मित्रानेच मित्राला लुटले; सात जणांच्या टोळीला पोलिसांनी केली अटक

**नवीन पनवेल : प्रतिनिधी**

चाकूने वार करून ५७ तोळ्यांचे दागिने चोरून नेणाऱ्या गुन्हेगारांना अटक करून खारघर पोलिसांनी मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्यातील पाच आरोपींची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली असून दोन आरोपी पोलीस कोठडीमध्ये आहेत. महत्त्वाचे म्हणजे यातील आरोपी फिर्यादी यांचा मित्र आहे.

यातील फिर्यादी सुशांत मोरे (३७, खारघर) हे मित्रांसोबत २२ एप्रिल रोजी जेवण करून कार पार्क करून पायी चालत जात होते. यावेळी त्यांच्या पाठीमागून तीन अनोळखी इसम आले आणि त्यांनी मोरे आणि त्यांच्या मित्रांसोबत झटापट करून मारहाण केली. ५७ तोळे सोन्याचे दागिने असलेली पिशवी जबरीने खेचून ते पळून गेले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी चार तपास पथके तयार केली. यावेळी फिर्यादीचा मित्र अभिनंदन माळी याने त्याची पत्नी व मेहुणा तसेच त्याचे गावाकडील साथीदार यांना फिर्यादीची माहिती देऊन गुन्ह्याचा कट रचला आणि गुन्हा घडवून आणल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अभिनंदन तानाजी माळी, कोमल अभिनंदन माळी, वैभव भानूदास माळी यांना २७ एप्रिल रोजी अटक केली, तर शुभम पाटोळे आणि संदीप गुंजळे यांना २८ एप्रिल रोजी अटक केली.

# मृत्यूशी झुंज देणाऱ्या तरुणाला मिळाले नवे आयुष्य!

**पनवेल : वार्ताहर**

भीषण रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या ३६ वर्षीय व्यक्तीवर नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करण्यात आले. अस्थिरोग विभागाचे संचालक डॉ. प्रमोद भोर यांच्या नेतृत्वाखाली टिमच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून या रुग्णाला नवे आयुष्य मिळाले.

या अपघाताचा आघात इतका तीव्र होता की,रुग्णाला असह्य वेदना होत होत्या, त्याला हालचाल करणे अशक्य झाले होते आणि दीर्घकालीन अपंगत्वाचा धोका निर्माण झाला होता.



वेळीच केलेल्या वैद्यकीय उपचारांमुळे आणि शरीराच्या विविध भागांवर केलेल्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमुळे, डॉक्टरांच्या टिमला रुग्णाची प्रकृती स्थिर करण्यात यश आले. सध्या तो पूर्णपणे बरा होण्याच्या मार्गावर असून लवकरच तो पुर्ववत आयुष्य जगण्यास सुरुवात करेल.

नवी मुंबईतील तळोजा येथे राहणारे ३६ वर्षीय भूषण एस. भालेकर हे ३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्रीच्या वेळी खारघर येथील सेक्टर ३५ एका रस्ते अपघाताने त्यांचे आयुष्य पूर्णपणे उलथवून टाकले. त्यांची स्कूटर आणि एक कार यांच्यात झालेल्या एका जोरदार धडकेत ते गंभीर जखमी झाले. या अपघातात त्यांच्या उजव्या मांडीचे, डाव्या पायाचे आणि डाव्या हाताच्या कोपरापुढील भागाचे हाड मोडले तसेच त्यांना शरीरावर अनेक ठिकाणी खोलवर जखमा आणि ओरखडेही आले होते. या अपघाताचा आघात इतका जबरदस्त होता की, त्यांना शरीराची कोणतीही हालचाल करणे अशक्य झाले होते; त्यांना असह्य वेदना होत होत्या आणि त्यांच्या शरीराच्या रचनेत झालेला बदल (विकृती) स्पष्टपणे दिसून येत होता. त्या अत्यंत गंभीर अवस्थेत, शरीराची अगदी सौम्य हालचाल करणेही त्यांना अशक्य झाले होते. ४ फेब्रुवारीच्या पहाटे त्यांना तातडीने मेडिकव्हर रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉ. प्रमोद भोर यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टिमने उपचाराची सूत्रे हाती घेतली व त्याचे प्राण वाचवण्यासाठी आवश्यक अशी आपत्कालीन वैद्यकीय सेवा सुरू केली.

# सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल १००%

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी – मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल शुक्रवार ८ मे रोजी सकाळी ११.३० वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला. २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाचा सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल १००% लागला असून कुमारी ईश्वरी उमेश खाडे हिने ९६.२०% मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. तसेच कुमार आदर्श




दादासो. शिंगाडे हा ९६.००% मिळवून द्वितीय व कुमार आर्यन साईनाथ पवार हा ९५.२०% मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. यावर्षी एकूण २०७ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १२६ विद्यार्थी उत्कृष्ट श्रेणी, ७१ विद्यार्थी प्रथम श्रेणी तर १० विद्यार्थी द्वितीय श्रेणी प्राप्त करून उत्तीर्ण झाले. विद्यालयाच्या या अभूतपूर्व यशाचे विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण सर, विद्यालयाच्या नवनिर्वाचित मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा मॅडम यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे विशेष कौतुक केले.

या निकालाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपकार्याध्यक्ष वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेलचे आमदार तथा कार्यकारिणी सदस्य प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पनवेलसाठी सिडकोने पाणी उपलब्ध करून द्यावे; खासदार श्रीरंग बारणे यांची सूचना

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत आहे. त्यामुळे सिडकोने या भागासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सिडको प्रशासनाला केली.



खासदार श्रीरंग बारणे यांनी बेलापूर येथील सिडको कार्यालयात सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल व व्यवस्थापकीय उपसंचालक गणेश देशमुख यांच्या समवेत मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक घेतली. पनवेल शहरातील खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्याची सूचना केली. तसेच पनवेल महानगरपालिका आणि सिडको संबंधित विविध प्रश्न, नागरी सुविधा आणि विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, विनोद साबळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले की, महापालिका क्षेत्रात पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. खारघर, तळोजा, कामोठे, कळंबोलीसाठी वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडते. सिडकोच्या परवानगीने मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले गेले आहेत. पनवेलमधील काही भाग सिडकोकडे होता. तो भाग महापालिकेत समाविष्ट झाला आहे. सिडकोकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. सिडकोने अतिरिक्त पाणी पनवेल महापालिकेला द्यावे. कचरा संकलन, वाहतुकीचे नियोजन करावे. भविष्यात निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्याची सूचना खासदार बारणे यांनी केली.

पनवेलचे महापौर नितीन पाटील यांचीही खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट घेतली. पनवेल शहरातील पाणीटंचाईच्या प्रश्नासंदर्भात सविस्तर चर्चा केली. वाढती लोकसंख्या आणि उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याबाबत यावेळी विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक नियोजन, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर आणि भविष्यातील उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. यावेळी स्थायी समिती अध्यक्ष बबन मुकादम, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अर्जुन म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख नगरसेवक रामदास शेवाळे, महानगरप्रमुख तथा नगरसेवक प्रथमेश सोमण, कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक, नगरसेवक चेतन भगत, हरीश केणी, सुमित झुंजारराव आदी उपस्थित होते.

# विमा योजना क्लिनिक सुरू करण्याची मागणी

**नवीन पनवेल : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात कामगार राज्य विमा योजनेचे क्लिनिक सुरू करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक तसेच असंघटित क्षेत्रातील कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळावा यासाठी कामगार राज्य विमा योजना अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र तालुक्यात या योजनेअंतर्गत क्लिनिक उपलब्ध नसल्यामुळे कामगारांना उपचारासाठी दूरच्या ठिकाणी जावे लागते.

त्यामुळे त्यांना आर्थिक आणि वेळेचा मोठा त्रास सहन करावा लागतो. महाड तालुक्यात ईएसआय क्लिनिक सुरू झाल्यास स्थानिक कामगारांना तत्काळ आणि दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील आणि कामगारांच्या आरोग्य संरक्षणास मोठी मदत होईल आणि त्यांची कार्यक्षमता वाढेल. म्हणून संबंधित विभागाशी पाठपुरावा करून तालुक्यात लवकरात लवकर कामगार राज्य विमा योजनेचे क्लिनिक सुरू करावे, अशी मागणी विनायक गांधी यांनी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे केली.

# रोडपाली येथून तरुणी बेपत्ता

**नवीन पनवेल :** सेक्टर २०, रोडपाली येथे घरकाम करण्यासाठी जाते असे सांगून घरातून निघून गेलेली १९ वर्षीय सोनाली धाकलू कचरे ही कामावर न जाता आणि घरीही परत न आल्याने ते हरवली असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिची उंची पाच फूट, चेहरा उभट, रंग काळा सावळा, नाक बसके आहे.

# जिल्ह्यात भात, नाचणी पिकाची उत्पादकता वाढविण्यावर भर द्या : मंत्री भरत गोगावले

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात ७३ हजार ३६५ हजार हेक्टरवर यंदा खरीपाच्या लागवडीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यात प्रामुख्याने भात आणि नागली पिकांचा समावेश आहे. जिल्ह्यात भाताची आणि नाचणी पिकाची उत्पादकता वाढविण्यावर भर देण्याचे निर्देश रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी शुक्रवारी (दि. ८) दिले.



रायगड जिल्ह्यात ९१ हजार ५२१ एवढे भात लागवडीचे क्षेत्र आहे. पण गेल्या वर्षी ७० हजार ४४६ हजार हेक्टरवर भात लागवड करण्यात आली होती. यावर्षी ७३ हजार २६५ हेक्टरवर खरीपाची लागवण करण्याचे उद्दीष्ट आहे. यंदा लागडवड क्षेत्र ३ हजार हेक्टरने वाढवण्याचे उद्दीष्ट कृषी विभागाने ठेवले आहे.

गेल्या वर्षी प्रती हेक्टरी उत्पादकता २ हजार ०८१ किलोग्रॅम होती. यावर्षी त्यात २ हजार ९९५ किलो ग्रॅम वाढ करण्याचे उद्दीष्ट अपेक्षित आहे. जिल्ह्यात २ हजार ८११ हेक्टर नाचणी लागवडीखालील क्षेत्र आहे. यापैकी गेल्या वर्षी २ हजार ४९१ हेक्टरवर नाचणीची लागवड करण्यात आली होती. यंदा २ हजार ५५० हेक्टरवर नाचणी पेरणीचे लक्षांक कृषी विभागाने ठेवला आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठी १६ हजार ९५० क्विंटल बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे. यात १६ हजार क्विंटल सुधारीत तर ६० क्विंटल संकरीत भात बियाण्याचा समावेश आहे. महाबिज आणि इतर खाजगी कंपन्याकडून हे बियाणे उपलब्ध होणार आहे. त्यासाठी नियोजन पूर्ण झाले आहे. यापैकी ३ हजार क्विंटल बियाणे विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे.

खरीप हंगामासाठी १४ हजार टन खतांची मागणी शासनाकडे रायगड जिल्हा कृषी विभागाने केली आहे. यात ११ हजार टन युरीया, ७०० टन डिएपी, १५०० मेट्रीक टन मिश्र खतांचा समावेश आहे. कृषी निविष्ठांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथक स्थापन करण्यात आली आहेत.

औद्योगीकीकरण आणि शहरीकरण यामुळे शेतीक्षेत्र घटत असले तरी शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे पिकांची उत्पादकता वाढवण्यावर भर द्या असे निर्देश रोजगार हमी आणि फलोतत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी यावेळी कृषी अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी सभापती वैकुंठ पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रुपाली सातपुते, कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत यावर्षी जिल्ह्यात मिरी, दालचिनी, सुरण आणि मशरुम तथा मटकी या पिकांची लागवड करण्याचे नियोजन कृषी विभागाने केले आहे.या शिवाय मागेल त्याचा काजू रोपे उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन केले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा श्रीवर्धनमध्ये संघटनात्मक बांधणीवर भर

**श्रीवर्धन : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत आणि व्यापक करण्याच्या उद्देशाने श्रीवर्धन तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. तालुकाध्यक्ष मंदार तोडणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची ताकद वाढवण्यासाठी या वेळी सखोल चर्चा करण्यात आली.

या वेळी मार्गदर्शन करताना नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष मंदार तोडणकर यांनी सांगितले की, "तालुक्यात पक्षाची मुळे अधिक घट्ट करण्यासाठी सक्षम आणि कार्यक्षम नावांची शिफारस वरिष्ठ पातळीवर करण्यात आली आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच नवीन कार्यकारणी जाहीर होईल आणि ही टीम नव्या जोमाने कामाला सुरुवात करेल."

पक्षाची ताकद वाढवण्यासाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापसातील मतभेद विसरून एकत्र येणे गरजेचे आहे. पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने मैदानात उतरावे, असे आवाहन तोडणकर यांनी या वेळी केले.

या बैठकीला मतदारसंघाचे अध्यक्ष श्री. उदय बापट, श्रीवर्धन पंचायत समिती सभापती सचिन किर, कार्याध्यक्ष संदेश काते, महिला अध्यक्षा सबा फिरफिरे, मोहम्मद भाई, मंगेश कोमनाक यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

आगामी काळात श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची लाट अधिक प्रभावी करण्यासाठी प्रत्येक गावोगावी जाऊन जनसंपर्क वाढवण्यावर या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने काम करण्याचे सूचित करण्यात आले.



# कुपोषणात आघाडीवर असलेल्या कर्जत तालुक्यातील कुपोषण घटले!



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका आदिवासी तालुका असल्याने या ठिकाणचे कुपोषणाची दरवर्षी राज्यभर चर्चा होत असायची. मात्र मागील काही वर्षात झालेले नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे कर्जत तालुक्याचे कुपोषण संपुष्टात आले आहे. कुपोषण निर्मुलनासाठी आघाडीवर असलेल्या कर्जत तालुक्याची कुपोषण निर्मूलनाचे झालेल्या प्रयत्नांची माहिती राज्याचे टास्क फोर्सचे प्रमुख राज्याचे माजी मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी घेतली.

राज्यमंत्री दर्जा असलेले राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्याकडून राज्यातील कुपोषणाचा आढावा घेतला जात आहे. त्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील कुपोषणाची माहिती घेण्यासाठी कर्जत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रमुख निर्मला कुचिक, आदिवासी उप योजनेच्या प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे तसेच कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय म्हसकर, कशेळे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रमेश कोकरे आणि कर्जत तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात चांगला अनुभव असलेले राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ दीपक सावंत यांच्याकडे टास्क फोर्स ची जबाबदारी देण्यात आली आहे. यावेळी कुपोषण, माता मृत्यू, बाल मृत्यू आणि नवजात मृत्यू यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या मृत्यूंची कारणे शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. कुपोषण कमी करण्यासाठी बालकांसाठी डे – केअर सुविधा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण सल्ला त्यांनी दिला. जोखमीच्या गरोदर मातांची नियमित तपासणी करण्यासाठी आशा आणि आरोग्य सेविकांनी वेळोवेळी भेटी द्याव्यात अशी सूचना केली. घरी प्रसूती टाळाव्यात आणि स्थलांतरित गरोदर महिलांची माहिती संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना लेखी स्वरूपात देण्यात यावी. असे निर्देश डॉ सावंत यांनी दिले. कर्जत तालुक्यातील खांडस, आंबिवली आणि कशेळे या भागांमध्ये अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. कर्जत येथे पुढील महिन्यात पुन्हा आढावा बैठक घेतली जाईल. असे डॉ. सावंत यांनी जाहीर केले. या बैठकीनंतर डॉ दीपक सावंत यांनी आयुष्मान भारत ब्लॉक पब्लिक हेल्थ युनिट तसेच उपजिल्हा रुग्णालयाची पाहणी केली.

# अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांसह पालकांची लगबग

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया २०२६–२७ साठी अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रियेला आता वेग आला आहे. राज्यभरातील विद्यार्थी व पालकांमध्ये प्रवेशाबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, शिक्षण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व विद्यार्थ्यांनी वेळेत ऑनलाइन नोंदणी करून प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन माणगाव कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य भानुदास बिरादार यांनी केले आहे.

प्रवेश प्रक्रियेनुसार ६ मे २०२६ पासून विविध टप्प्यांना सुरुवात झाली असून, विद्यार्थ्यांची नोंदणी, अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी आणि पसंतीक्रम निश्चितीची प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर २० मे २०२६ पासून नियमित प्रवेश फेरीला अधिकृतपणे सुरुवात होणार आहे. ६ मे २०२६ अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले असून मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या. ११ मे ते १३ मे २०२६ विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी, अर्ज भरणे आणि पसंतीक्रम निश्चित करण्याची संधी देण्यात आली आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांनी आपली माहिती काळजीपूर्वक भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. ४ मे ते १८ मे २०२६

कनिष्ठ महाविद्यालयांकडून कागदपत्र पडताळणी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करून आवश्यक दुरुस्तीसाठी सूचना दिल्या जाणार आहेत. १६ मे २०२६ विद्यार्थ्यांना अर्जामधील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. चुकीची माहिती किंवा अपूर्ण कागदपत्रे असल्यास ती या कालावधीत सुधारता येणार आहेत. २० मे २०२६ अकरावी प्रवेश प्रक्रियेतील नियमित प्रवेश फेरीला अधिकृत सुरुवात होणार आहे. गुणवत्ता यादीच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना खालील कागदपत्रांची आवश्यकता भासणार आहे. दहावी गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) उत्पन्न प्रमाणपत्र,नॉन–क्रीमी लेअर प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास),पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे. यंदाही विज्ञान शाखेसाठी विद्यार्थ्यांचा मोठा कल असल्याचे चित्र दिसून येत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयटी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील वाढत्या संधींमुळे विज्ञान शाखेला अधिक मागणी आहे. त्याचबरोबर वाणिज्य शाखेमधून बँकिंग, फायनान्स, सीए आणि व्यवस्थापन क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध असल्याने या शाखेलाही विद्यार्थ्यांची पसंती मिळत आहे. शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना अर्ज भरताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. चुकीची माहिती, अपूर्ण कागदपत्रे किंवा चुकीचा पसंतीक्रम भरल्यास प्रवेश प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अंतिम सबमिट करण्यापूर्वी सर्व माहिती तपासून पाहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रक्रिया समजण्यासाठी अनेक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांना अर्ज भरणे, कागदपत्र अपलोड करणे आणि प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देत आहेत. दरम्यान, अंतिम दिवसाच्या गर्दीपासून वाचण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अकरावीचा प्रवेश हा विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरचा महत्त्वाचा टप्पा मानला जात असल्याने विद्यार्थी आणि पालकांनी ही प्रक्रिया गांभीर्याने पूर्ण करण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

# माणगाव एस. एस. निकम इंग्लिश स्कूलचा दहावीच्या परीक्षेचा ९७.८९ टक्के निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल शुक्रवार दि.८ मे २०२६ रोजी जाहीर झाला.या परीक्षेत शैक्षणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या माणगाव येथील एस.एस.निकम इंग्लिश स्कुलने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल ९७.८९ टक्के लागला असून कु.अदित्य राजू छेडा व कु.आयुष सचिन डवले या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९३.४० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून कु.नायाब मंझूर वाडेकर,कु.मुक्ता निशांत बेंडखळे व रिद्धी आत्माराम उभारे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९३ टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, कु.साजिरी राजेंद्र गायकवाड या विद्यार्थिनीने ९१.६० टक्के गुण संपादन करून तृतीय क्रमांक,कु.ऋतुजा दिनेश खडतर या विद्यार्थिनीने ९१.२० टक्के गुण मिळवत चतुर्थ क्रमांक,कु.संस्कार राजेंद्र म्हसकर व अद्वैत वैभव कोकणे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९० टक्के गुण संपादन करून पाचवा क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ९५ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ९३ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेत ९ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असून विशेष श्रेणीत ४२ विद्यार्थी असून प्रथम श्रेणीत ३३ तर द्वितीय श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेचा दरवर्षी निकाल उंचावत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. शाळेच्या प्राचार्या डॉ. संगीता कोकाटे आणि उपप्राचार्य विजय पाईकराव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे हे फळ असल्याचे संस्थेमार्फत सांगण्यात आले. "विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासामुळेच शाळेला हे यश प्राप्त झाले आहे. या यशात शिक्षक आणि पालकांचाही मोठा वाटा आहे,

# र. ना. राऊत विद्यालयाचे यश

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

र. ना. राऊत माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, श्रीवर्धन (जि. रायगड) या नामांकित शैक्षणिक संस्थेने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. संस्थेचा एकूण निकाल ९२.९०% लागला असून शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखण्यात विद्यालयाने यश मिळवले आहे.

या परीक्षेस एकूण १४१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १३१ विद्यार्थी यशस्वी ठरले असून विद्यालयाचा निकाल ९२.९०% नोंदविण्यात आला आहे. हा निकाल केवळ टक्केवारीपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या शिस्तबद्ध शैक्षणिक धोरणाचे फलित आहे.

यंदाच्या निकालात अमृता कचरेकरने ४८३ गुण (९६.६०%) मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सुशांत राजेने ४६३ गुण (९४.००%) मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांकावर देवेंद्र वैद्य (४४९ गुण) राहिला. त्यानंतर श्रेया चौलकरने (४४६ गुण, ९०.२०%) चौथा क्रमांक मिळवला. विशाख धर्माधिकारीने (४४२ गुण, ८९.००%) पाचवा क्रमांक मिळवला.

या यशाबद्दल मुख्याध्यापकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून शिक्षकवर्ग व पालकांचे सहकार्यही महत्त्वाचे ठरल्याचे सांगितले. अपयशी विद्यार्थ्यांनी खचून न जाता पुढील संधीमध्ये यश मिळवावे, असे आवाहनही करण्यात आले. या संस्थेने पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

# जोसरांजण येथे अनिकेत तटकरे यांच्या हस्ते सभामंडपाचे लोकार्पण; कै. अनंत ठाकूर यांच्या नावाने कमान साकारणार

**मुरुड : प्रतिनिधी**

कै.अनंत ठाकूर यांचे सामाजिक कार्य महान होते .गावाच्या विकासासाठी ते सतत झटत असावयाचे .गाव एकसंघ राहावा हि त्यांची भावना असावयाची त्यांच्या इच्छेप्रमाणेच गावाच्या विकासासाठी म्हणजेच श्री बापदेव मंदिर जीर्णोद्वार व सभामंडपाच्या कामासाठी खासदार निधीमधून २५ लाखाचा भरीव निधी देण्यात आला होता आज हे काम पूर्ण होऊन याचे लोकार्पण करताना आनंद होत असून अनंत ठाकूर यांची इच्छापूर्ती बरोबरच कै.अनंत ठाकूर यांच्या नावाने काँक्रिट कमान गावाच्या प्रवेशद्वाजवळ लवकरच बनवणार असून यासाठी लवकरच निधी उपलब्ध करून दिला जाईल असे आश्वासन माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी दिले आहे .



जोसरांजण येथे खासदार सुनील तटकरे यांच्या खासदार निधीमधून २५ लाख रुपये निधी खर्च करून सभामंड्प व मंदिर जीर्णोद्वार चे काम पूर्ण करण्यात आले . या कामांचे लोकार्पण माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या शुभ हस्ते फीत कापून व विधिवत पूजा करून करण्यात आले .यावेळी ते आपल्या मार्गदर्शन भाषणात बोलत होते .यावेळी व्यासपीठावर तालुका अध्यक्ष फैरोझ घलटे , नगरसेवक मनोज भगत मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ सोशल मीडिया सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन माजी सभापती अशीका ठाकूर नगरसेविका प्रीता चौलकर , प्रांजली मकू , सचिव विजय पैर विकास दिवेकर आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर राजपुरी उपसरपंच इस्माईल सिद्दीकी योगेंद्र गोयजी माजी सरपंच मनीष नांदगावकर सूर्यकांत तोडणकर आदेश भोईर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी जोसरांजन गावाचे कौतुक केले गाव एकसंघ असून गावाच्या मंदिरासाठी मुंबईकर मंडळीसहीत स्थानिक ग्रासमथ यांनी सुद्धा आर्थिक सहकार्य करून गावात टुमदार मंदिर उभारण्यास महत्वपूर्ण सहकार्य केले, असे सांगितले. सुत्रसंचलन आदेश भोईर तर आभार योगेंद्र गोयजी यांनी केले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग नामकरण

**पाली : प्रतिनिधी**

पाली नगरपंचायतीतर्फे बसस्थानकाकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गाचे नामकरण 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग' असे करण्यात आले आहे. यानिमित्ताने नगरपंचायतीच्या वतीने भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या नामकरणाने हा मार्ग उजळून निघाला आहे.

यावेळी नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेंनसेकर, नगरसेवक सुधीर भालेराव, नगरसेवक आरिफ मणियार, गणेश सावंत, सुधागड तालुका बौद्धजन पंचायत रजिनंबर २७ ५६ अध्यक्ष दीपक पवार. मारुती गायकवाड, प्रभाकर गायकवाड, छनक शिर्के, नरेश शिंदे, राहुल सोनवणे, भगवान शिंदे, रवींद्रनाथ ओवाळ, राजेश गायकवाड, मोरेश्वर कांबळे, भीम महाडिक, चंद्रगुप्त भालेराव, जयवंत कांबळे, दिलीप मोरे, राहुल कांबळे, रमेश साळुंखे, मंगेश भालेराव, रोहिणी जाधव, नूतन शिंदे, नयना वाघमारे, अक्षता जाधव, नगरपंचायतीच्या वतीने आणि सुधागड तालुका बौद्धजन पंचायत रजिस्टर नंबर २७ ५६ पालीचे पदाधिकारी व ग्रुप शाखांचे पदाधिकारी आणि सुधागड तालुक्यातील सर्व आंबेडकरी विचारधारेचे भीम अनुयायी, बहुजन बांधव, धम्मबांधव उपस्थित होते.

# कोलकाताचा दिल्लीवर दणदणीत विजय

## फिन ॲलनची तडाखेबंद नाबाद शतकी खेळी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजधानी दिल्ली येथील अरुण जेटली स्टेडियमवर शुक्रवारी झालेल्या आयपीएलच्या ५१व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने (केकेआर) यजमान दिल्ली कॅपिटल्सवर (डीसी) आठ गडी राखून दणदणीत विजय नोंदवला.

कोलकात्याच्या विजयाचा शिल्पकार ठरला, तो सलामीवीर फिन ॲलन. त्याने दिल्लीच्या गोलंदाजीची पिसे काढत अवघ्या ४७ चेंडूंत नाबाद १०० धावांची खेळी केली. केकेआरने दिल्लीने विजयासाठी दिलेले १४३ धावांचे आव्हान अवघ्या १४.२ षटकांत पूर्ण केले. या विजयामुळे कोलकाताने गुणतालिकेत आपली स्थिती अधिक भक्कम केली आहे.



तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा कोलकाताचा निर्णय सार्थ ठरला. सलामीवीर पाथुम निसांका (५०) आणि के. एल. राहुल (२३) यांनी ४.६ षटकांत ४९ धावा जोडल्या, मात्र राहुल बाद झाल्यानंतर दिल्लीच्या डावाला गळती लागली. मधल्या फळीत नितीश राणा (८), समीर रिझवी (३) आणि ट्रिस्टन स्टब्स (२) स्वस्तात बाद झाले. आशुतोष शर्माने ३९ धावांचे योगदान दिल्यामुळे दिल्लीला २० षटकांत ८ बाद १४२ धावांपर्यंत मजल मारता आली. कोलकात्याकडून अनुकुल रॉयने सर्वाधिक तीन बळी घेतले.

१४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कोलकात्याची सुरुवातही खराब झाली. अजिंक्य रहाणे (१३) आणि अंगक्रिश रघुवंशी (१) झटपट बाद झाल्याने केकेआरची अवस्था ३.४ षटकांत २ बाद ३१ अशी झाली होती, पण त्यानंतर फिन ॲलनने मैदानावर वादळ आणले. त्याने पाच चौकार आणि तब्बल १० षटकार ठोकत १४.२ षटकांतच सामना संपवला. त्याला कॅमेरून ग्रीनने (२७ चेंडूंत नाबाद ३३) सुंदर साथ दिली.

# यशस्वी जैस्वाल, शफाली वर्माला धक्का!

## ‘नाडा’ने बजावली नोटीस, बीसीसीआयकडे तक्रार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६चा थरार सध्या जोरात सुरू आहे. पण या सगळ्यात अनेक घडामोडीही होताना दिसत आहेत. आता एक मोठा प्रकार भारतीय क्रिकेटमधून समोर आला असून आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळणाऱ्या युवा भारतीय सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि युवा महिला संघाची सलामीवीर शफाली वर्मा या दोघांना डोप चाचणीत संबंधित नोटीस बजावण्यात आली आहे.

एका रिपोर्टनुसार भारतीय क्रिकेटचे हे दोन्ही स्टार खेळाडू डोप चाचणीसाठी उपलब्ध नव्हते. त्यामुळे बीसीसीआय आणि आयसीसीकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या रिपोर्टनुसार राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेने (नाडा) चाचणीसाठी अनुपलब्ध असल्याबद्दल डिसेंबरमध्ये दोन्ही खेळाडूंना नोटीस बजावली होती. शेफाली आणि यशस्वी या





नाडाच्या नोंदणीकृत चाचणी गटात समाविष्ट असलेल्या काही भारतीय क्रिकेटपटूंपैकी आहेत.


या गटात समाविष्ट असलेल्या सर्व खेळाडूंना दरवर्षी त्यांची ठिकाणे आणि वेळा आगाऊ माहिती देत कळवणे बंधनकारक आहे आणि तसे न केल्यास त्यांना नोटीस बजावली जाते. हे ‘व्हेयरअबाउट क्लॉज’चे उल्लंघन मानले जाते. याच नियमाचे यशस्वी व शेफाली यांनी उल्लंघन केले आहे.

नोटीसनुसार, गेल्या वर्षी १७ डिसेंबरला यशस्वी जैस्वालची डोप चाचणी घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, तर शफाली वर्माची चाचणी ७ नोव्हेंबरला नियोजित होती. दोन्ही वेळा संबंधित खेळाडू त्यांनी दिलेल्या ठिकाणी उपस्थित नव्हते. यानंतर ‘नाडा’ने अनुक्रमे १८ आणि २० फेब्रुवारी रोजी दोन्ही खेळाडूंकडे स्पष्टीकरण मागितले, मात्र कोणाकडूनही उत्तर न मिळाल्याने त्यांच्या नावावर पहिली ‘मिस्ड टेस्ट’ नोंदवण्यात आली.

### काय सांगतो नियम?

नाडाच्या ‘रजिस्टरड टेस्टिंग पूल’मध्ये समाविष्ट असलेल्या खेळाडूंना स्पर्धेबाहेरील डोप चाचणीसाठी ठराविक वेळ आणि ठिकाणाची माहिती द्यावी लागते. डोपिंग कंट्रोल अधिकारी त्या दिलेल्या वेळेत अचानक येऊन नमुने घेऊ शकतात, मात्र खेळाडू संबंधित ठिकाणी उपस्थित न आढळल्यास त्याची नोंद ‘मिस्ड टेस्ट’ म्हणून केली जाते. एकच मिस्ड टेस्ट म्हणजे थेट डोपिंग नियमभंग मानला जात नाही. पण १२ महिन्यांच्या कालावधीत तीन वेळा अशा प्रकारची चूक झाल्यास तो डोपिंगविरोधी नियमांचा भंग मानला जाऊ शकतो.

# कुणाल-पूरन यांचा ‘तो’ व्हिडीओ मस्करीचा भाग!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आरसीबीचा अष्टपैलू खेळाडू क्रुणाल पांड्या आणि लखनऊ सुपर जायंट्सचा विस्फोटक फलंदाज निकोलस पूरन यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. या व्हिडीओमध्ये पूरन हा पांड्याची कॉलर पकडताना दिसला. त्यामुळे या दोघांमध्ये मैदानात वाद झाला, अशा चर्चा सोशल मीडियावर वेगाने पसरल्या, मात्र या चर्चांमागचे सत्य आता स्वतः दोन्ही खेळाडूंनीच स्पष्ट केले आहे. मैदानावरील तो क्षण हा कोणत्याही वादाचा नसून निव्वळ मैत्रीपूर्ण मस्करीचा भाग असल्याचे स्पष्ट झाले आहे.

क्रुणाल पांड्याने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर निकोलस पूरनसोबतचा एक फोटो शेअर करत सर्व तर्कवितर्कांना पूर्णविराम दिला. त्याने पोस्टमध्ये लिहिले की, “कोणताही वाद नाही, केवळ प्रेम! माझा भाऊ निकोलस पूरनला आयपीएलमध्ये १०० सामने पूर्ण केल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. मला तुझा अभिमान आहे. भावा, तुझ्याकडून अजूनही खूप काही पहायला मिळणार आहे. असो, तो ‘बाउन्सर’ कसा वाटला?” क्रुणालच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला.

विशेष म्हणजे, निकोलस पूरननेही या पोस्टवर प्रतिक्रिया देत दोघांमधील मैत्री अधोरेखित केली. पूरनने कमेंटमध्ये लिहिले की, “मित्रांनो, इथे केवळ प्रेमच आहे. तो माझ्या सर्वोत्तम मित्रांपैकी एक आहे.” त्यामुळे हा कथित ‘वाद’ नसून दोन जवळच्या मित्रांमधील निव्वळ मजेशीर क्षण असल्याचे स्पष्ट झाले आहे.


# केकेआरचे जोरदार पुनरागमन

## आयपीएल पॉईंट टेबलमध्ये मोठे बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाता नाइट रायडर्सने आयपीएल २०२६मध्ये जोरदार पुनरागमन करत सलग चौथा विजय मिळवला आहे. सुरुवातीचे सहा सामने जिंकण्यात अपयशी ठरलेला कोलकाता आता प्लेऑफच्या शर्यतीत पुन्हा दमदारपणे उतरली आहे. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात केकेआरने दिल्ली कॅपिटल्सला सहज पराभूत केले.

या सामन्यात कोलकाताचा कर्णधार अजिंक्य रहाणे याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. फलंदाजीसाठी चांगली असलेल्या खेळपट्टीवर दिल्लीची सुरुवात ठीक झाली होती. केएल राहुल आणि पथुम निसांका यांनी पहिल्या विकेटसाठी ४९ धावांची भागीदारी केली. निसांकाने



अर्धशतक झळकावले, तर राहुलने २३ धावा केल्या.

यानंतर मात्र दिल्लीची मधली फळी पुन्हा एकदा कोसळली. अक्षर पटेलला २२ चेंडूत फक्त ११ धावा करता आल्या. याशिवाय नितीश राणा ८, समीर रिजवी ३ आणि ट्रिस्टन स्टब्स २ धावांवर बाद झाले. त्यामुळे दिल्लीला २० षटकांत केवळ १४२ धावांपर्यंत मजल मारता आली.

हे लक्ष्य कोलकाताने अवघ्या १४.२ षटकांत म्हणजे ३४ चेंडू राखून पूर्ण केले. या विजयामुळे कोलकात्याच्या नेट रनरेटमध्येही सुधारणा झाली आहे. या विजयासह केकेआर आता गुणतालिकेत सातव्या स्थानावर पोहचली आहे. कोलकात्याने १०पैकी चार सामने जिंकले असून पाच सामने गमावले आहेत, तर एक सामना रद्द झाला होता. संघाच्या खात्यात आता नऊ गुण झाले आहेत.

दुसरीकडे दिल्ली कॅपिटल्सची परिस्थिती अधिक कठीण झाली आहे. दिल्ली आता आठव्या स्थानावर घसरली असून संघाच्या खात्यात आठ गुण आहेत. दिल्लीच्या खाली मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स हे संघ आहेत. दोघांचेही प्रत्येकी सहा गुण आहेत.

दिल्ली, मुंबई आणि लखनौ या तिन्ही संघांसाठी आता परिस्थिती अत्यंत अवघड झाली आहे. हे संघ उर्वरित सर्व सामने जिंकले तरी जास्तीत जास्त १४ गुणांपर्यंतच पोहचू शकतील. त्यामुळे त्यांचे भवितव्य आता इतर अव्वल संघांच्या निकालांवर अवलंबून राहणार आहे.


# कुस्तीपटू विनेश फोगटला कारणे दाखवा नोटीस

**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय कुस्ती महासंघाने महिला कुस्तीपटू विनेश फोगट हिच्यावर गैरशिस्त आणि उत्तेजक द्रव्य विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. महासंघाने तिच्यावर २६ जून २०२६पर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यावर बंदी घातली आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

नाट्यमय घडामोडींनंतर विनेश गेल्या वर्षी निवृत्तीतून माघार घेऊन कुस्तीत परतली होती. गोंडा येथे १० ते १२ मेदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय खुल्या मानांकन कुस्ती स्पर्धेत ती सहभागी होणार होती, पण जवळपास १८ महिन्यांनंतर कुस्तीमध्ये पुनरागमन करणाऱ्या विनेशच्या कारकिर्दीला हा एक मोठा धक्का मानला जात आहे. विनेशला या नोटीशीवर प्रतिसाद देण्यासाठी १४ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

# नव्या नायरकडून युवराज सिंगप्रति आदर व्यक्त



**तिरुवनंतपूरम : वृत्तसंस्था**

केरळमध्ये आयोजित एका विशेष कार्यक्रमात मनोरंजन आणि क्रीडाविश्वातील दोन मोठे तारे एकत्र आले होते. मल्याळम चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री नव्या नायर आणि भारतीय क्रिकेटचा ‘सिक्सर किंग’ युवराज सिंग एकाच व्यासपीठावर असताना एका क्षणाने आणि अभिनेत्रीच्या एका कृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

केरळमधील एका कार्यक्रमादरम्यान जेव्हा नव्या नायर युवराज सिंगला भेटली, तेव्हा तिने अत्यंत विनम्रतेने त्याचे स्वागत केले. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये नव्या नायर युवराज सिंगचा आदर करून त्याला वाकून नमस्कार करताना दिसली. यावेळी या दोघांचे स्वागत करण्यासाठी पाकळ्या उडवण्यात आल्या. त्या पाकळ्या युवराजच्या खांद्यावर पडल्याचे पाहून ती हळूवार त्या पाकळ्या काढताना दिसली. इतकेच नव्हे तर नंतर तिने छान स्मितहास्य करत युवराजशी संवाद साधला आणि त्याच्याकडून काही बॅटवर स्वाक्षरीदेखील घेतल्या. या क्षणांचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत.

युवराज सिंगनेही नव्या नायरच्या या कृतीला तितक्याच आपुलकीने प्रतिसाद दिला. दोघांमधील हा सुसंवाद पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. दक्षिणात्य चित्रपटसृष्टीत विशेषतः केरळमध्ये पाहुण्यांचा आणि ज्येष्ठांचा आदर करण्याची मोठी परंपरा आहे. नव्या नायरने इतकी मोठी अभिनेत्री असूनही युवराजबद्दल जो आदर दाखवला, त्याचे सोशल मीडियावर कौतुक होत आहे.

# पाकिस्तानच्या संघात चक्क भारतीय खेळाडूंची नावे!

## ‘ब्रॉडकास्टर’मुळे सोशल मीडियावर ट्रोलिंग

**ढाका : वृत्तसंस्था**

ढाका येथील शेर-ए-बांगला नॅशनल स्टेडियमवर बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याच्या सुरुवातीलाच प्रसारकांकडून मोठी चूक झाली, ज्यामुळे त्यांना सोशल मीडियावर टीकेला आणि थट्टेला सामोरे जावे लागत आहे.

सामना सुरू असताना ब्रॉडकास्टर्सनी पाकिस्तानच्या खेळाडूंची आकडेवारी पडद्यावर दाखवण्याचा प्रयत्न केला, मात्र पाकिस्तानच्या संघात चक्क भारतीय खेळाडूंची नावे झळकल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. ऑन-स्क्रीन ग्राफिकमध्ये चक्क रोहित शर्माला पाकिस्तानचा कर्णधार म्हणून दाखवण्यात आले होते. या ग्राफिकमध्ये केवळ रोहितच नाही, तर शुभमन गिल, तिलक वर्मा, शिवम दुबे, जितेश शर्मा, रिंकू सिंग, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग आणि मुकेश कुमार यांसारख्या भारतीय खेळाडूंची नावे होती. ही मोठी चूक सोशल मीडियावर वाऱ्यासारखी पसरली आणि चाहत्यांनी यावर मजेशीर प्रतिक्रिया देत ब्रॉडकास्टर्सना चांगलेच ट्रोल केले.



PAKISTAN
TEST CAREER

| | MATCHES | WKTS | AVG |
|---|---|---|---|
| ROHIT SHARMA | 22 | 1 | 9.97 |
| SHUBMAN GILL | 5 | - | - |
| TILAK VARMA | 5 | 2 | 5.20 |
| SHIVAM DUBE | 32 | 10 | 9.77 |
| JITESH SHARMA | 3 | - | - |
| RINKU SINGH | 7 | 3 | 3.00 |
| AXAR PATEL | 60 | 60 | 7.42 |
| WASHINGTON SUNDAR | 47 | 44 | 6.89 |
| RAVI BISHNOI | 31 | 48 | 7.19 |
| ARSHDEEP SINGH | 53 | 83 | 8.41 |
| MUKESH KUMAR | 16 | 18 | 9.08 |

PAKISTAN WON THE TOSS & CHOSE TO BOWL

# केएल राहुलचा महारेकॉर्ड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध शुक्रवारी झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा पराभव झाला. नाणेफेक हरल्यावर प्रथम फलंदाजीवेळी दिल्ली संघाला हवी तशी सुरुवात करता आली नाही. आघाडीचा फलंदाज केएल राहुल अवघ्या २३ धावा करून माघारी परतला, पण या छोट्या खेळीसह त्याने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

आयपीएल स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना केएल राहुल याने एक हजार धावा पूर्ण केल्या आहेत. यासह तो आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात तीन वेगवेगळ्या संघांकडून खेळताना एक हजार धावांचा पल्ला गाठणारा तो पहिलाच फलंदाज ठरला आहे. याआधी कुठल्याही फलंदाजाला अशी कामगिरी करता आलेली नाही.









**सातारा : रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी स्वतःच्या दातृत्वाने शंभर कोटींहून अधिक रुपयांची आर्थिक मदत करणारे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार, थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचा तसेच ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेडने यंदाही रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी तीन कोटी ६२ लाख रुपयांची देणगी दिली असून याबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते शनिवारी कर्मवीरभूमीत जाहीर हृद्य सत्कार करण्यात आला. सोबत इतर मान्यवर.**

# युजवेंद्र चहलने विमानात ओढली ई-सिगारेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ आता अखेरच्या टप्प्यात आहे, मात्र गेल्या काही दिवसांपासून रोज नवीन वादांना तोंड फुटत आहे. गेल्या आठवड्यात राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग एका आयपीएल सामन्यादरम्यान ड्रेसिंग रुममध्ये ई-सिगारेटचा वापर करताना दिसला होता. त्यावर बीसीसीआयने त्याला दंड ठोठावला. आता पंजाबचा स्टार फिरकीपटू युजेंद्र चहलचाही विमानात ई-सिगरेटचा वापर करतानाचा

## व्हिडीओ व्हायरल



व्हिडीओ व्हायरल होत आहे.

विमान प्रवासाच्या नियमांनुसार विमानात इलेक्ट्रॉनिक सिगरेट घेऊन जाने किंवा त्याचा वापर करणे हे नियमांचे गंभीर उल्लंघन मानले जाते. विमानात सिगरेट वापरल्याने आगीचा धोका असतो, ज्यामुळे संपुर्ण विमानाला आग लागण्याची शक्याता असते. विमानात सिगारेटचा वापर करण्यात आलेल्या खेळाडूवर कायदेशीर कारवाई होऊ शकते आणि त्या खेळाडूला विमान प्रवासावर बंदीही आणण्यात येऊ शकते.

दरम्यान, युझवेंद्र चहल हा विमानात प्रवास करताना अर्शदीप सिंगच्या कॅमेऱ्यात वेपिंग करताना कैद झाला. त्यामुळे बीसीसीआयने अर्शदीपला पुढे आदेशापर्यंत व्हिडीओ ब्लॉगिंग करण्यास बंदी घातली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com